मराठी भाषेतील प्रसिद्ध लोकनाट्य

# गंगासागर

डॉ. न. ह. खोडे



आज कोणीही ठामपणे सांगू शकत नाही की, 'गंगासागर' या लोकनाट्याचा प्रयोग कधी झाला होता. मात्र विदर्भात या लोकनाट्याचे प्रयोग १९७० ते १९७५ च्या जवळपास झाल्याचे सांगतात. त्या काळात अनेक गावात या नाटकाचे प्रयोग झालेले आहेत. हे एक चार अंकी नाटक आहे; परंतु याची लिखित संहिता उपलब्ध नाही. ग्रामीण भागातील कलावंतांनी ही संहिता मौखिक रुपाने जतन करून ठेवलेली आहे. परंतु आज फारच कमी लोकांना ती येते.

शोधाअंती याचा कर्ता मिळाला नाही. अनेक कलावंतांकडून ही संहिता लिहून घ्यावी लागली. अल्लीपूर, क्षीरसमुद्र, निधा या गावातील कलावंतांनी यासाठी मदत केली. चारपाच वर्षाच्या प्रयत्नानंतर ही संहिता पुस्तक रुपाने येत आहे. मराठी भाषेतील हे चार अंकी नाटक नष्ट होता होता वाचले, याचेच मोठे समाधान वाटते.



डॉ. न. ह. खोडे
मराठी विभाग प्रमुख,
यशवंत महाविद्यालय, वर्धा

प्रकाशक : डॉ. न. ह. खोडे
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालयाच्या जवळ,
नालवाडी, वर्धा.

ISBN 978-81-928787-1-3

# गंगासागर

## ( मराठी भाषेतील प्रसिद्ध लोकनाट्य )

**डॉ. न. ह. खोडे**

बी.एस्सी, (जीवशास्त्र), एम.ए. (मराठी), पीएच.डी, सेट.

**मराठी विभाग प्रमुख,**
**यशवंत महाविद्यालय, वर्धा.**

**गंगासागर** **ISBN 978-81-928787-1-3**
डॉ. न. ह. खोडे

**Gangasagar**
Dr. N. H. Khode

## सर्व हक्क

सौ. वैशाली न. खोडे
स्टेट बँक कॉलनी, नालवाडी, वर्धा. ४४२००१ (महाराष्ट्र)

## प्रकाशक

डॉ. न. ह. खोडे
प्रियदर्शिनी महिला कॉलेज जवळ, नालवाडी, वर्धा, महाराष्ट्र.
०७१५२–२५०५७८, ९८५०५३७६१५
E-Mail : nhkhode@yahoo.com

## प्रथमावृत्ती

१५ ऑगस्ट, २०१४

## अक्षर जुळवणी व मांडणी

श्री राजेंद्र गोविंदराव भोयर
स्टेट बँक कॉलनी, नालवाडी, वर्धा. (महाराष्ट्र)

## मुद्रक

निऋती मुद्रणालय, वर्धा.
स्टेट बँक कॉलनी, नालवाडी, वर्धा. (महाराष्ट्र)
०७१५२–२५०५७८, ९८५०१२२८१९

## मुखपृष्ठ संकल्पना

दिनेश निमसटकर,
सिलिकॉन ग्रॅफिक्स, आर्वी नाका, मेन रोड, वर्धा.

**किंमत – ८० रूपये.**

# अर्पण पत्रिका .....

मनोरंजनाची कोणतीही आधुनिक साधने नसताना ज्यांनी समाजाचे मनोरंजन केले. त्या जगभरातील सर्व लोककलावंतांना; व माझे वडील स्मृतिशेष श्री हरिश्चंद्र नारायण खोडे यांना कृतज्ञतापूर्वक सविनय अर्पण.

# आभार ....

**गंगासागरचे संवाद लिहिण्यासाठी यांची फार मोठी मदत झाली —**

कु. वंदना लक्ष्मणराव डांगरी. श्री सुरेशराव बोरकर (मु. पो. अल्लीपूर, तालुका हिंगणघाट, जिल्हा वर्धा ).

**यांच्यामुळे इ. स. २०१२ मध्ये दसऱ्याच्या रात्री गंगासागरचा प्रयोग झाला —**

कु. सोनाली बटाले, कु. रोशनी महाजन (मु. पो. क्षीरसमुद्र, तालुका सेलू, जिल्हा वर्धा ).

**यांनी इ. स. २०१२ मध्ये दसऱ्याच्या रात्री गंगासागरचा प्रयोग केला —**

सर्वश्री — कुंडलिक मुंगले, मारोतराव बटाले, श्रावणजी जोगवे, विनायकराव जामुनकर, मनोहर मारोतराव कोल्हे, प्रफुल्ल उद्धवराव कोल्हे, सचिन गोविंदराव पाल, विशाल सुरेशराव भुते, नितीन वासाड. ( मु. पो. क्षीरसमुद्र, तालुका सेलू, जिल्हा वर्धा ).

**दसऱ्याच्या रात्री झालेल्या गंगासागरच्या प्रयोगात हे वाद्यवृंद होते —**

सर्वश्री — बाबाराव भुजाडे, रमेशराव जामनकर, भारत भुते, अनिल लखवादे, रूपेश भुते, पुरूषोत्तम वासाड, प्रकाश महाजन, श्री मुंगले, नितीन वासाड. ( मु. पो. क्षीरसमुद्र, तालुका सेलू, जिल्हा वर्धा ).

# अनुक्रमणिका

१. मनोगत ........ ०६
२. गंगासागरचे कथानक ........ ११
३. गंगासागर लोकनाट्याचा आकृतीबंध ........ १९
४. रंगभूषा व वेशभूषा ........ २०
५. वाद्यवृंद ........ २१
६. रंगमंच ........ २२
७. गंगासागरमधील गाणी ........ २२
८. गंगासागर नाटकातील व्यक्तिचित्रे : —
अ. गंगासागर राणी ........ २५
ब. दिवाण ........ २८
क. संतसेन ........ ३०
ड. कमलावती ........ ३२
इ. शिपाई ........ ३२
फ. दंतपाल ........ ३३
ब. गुराखी, वढर, शेटजी व मावशी ........ ३४
९. पात्र परिचय ........ ३५
१०. अंक पहिला ........ ३६
११. अंक दुसरा ........ ५४
१२. अंक तिसरा ........ ६८
१३. अंक चौथा ........ ८५

# मी.......

नक्की आठवत नाही; पण असेल मी तेव्हा सहाव्या सातव्या वर्गात, ज्यावेळेला माझ्या गावात 'गंगासागर' ह्या लोकनाट्याचा खेळ झाला होता. आता त्या गोष्टीला जवळपास तीस ते पस्तीस वर्ष झाले असावे. गावात त्यावेळी 'वारकरी भजन मंडळ' होते. मला जेव्हा चांगला समज यायला लागला तेव्हा श्री गुरूदेव सेवा मंडळाच्या दोन भजन मंडळ्या होत्या. त्यावेळी गावात भजन, कीर्तन, काला, नामसप्ताह, एक्का; व सर्व देवतांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या होत होत्या. या सर्वात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी तयार केलेल्या 'सामुदायिक ध्यान' व 'सामुदायिक प्रार्थना' यांचा प्रभाव होता. पंचक्रोशीत हे गाव (येरणगाव) फारच धार्मिक असल्याची पावती मिळत होती. गुरूदेव सेवा मंडळात गावातील प्रतिष्ठित लोक असल्यामुळे त्यांच्या शब्दाच्या बाहेर कोणी जात नसे. तो काळ १९७५ ते १९८० चा असावा. याच वेळेस गंगासागर ह्या लोकनाट्याचे प्रयोग गावागावात होत होते.

मला आठवते त्याच काळात आजुबाजूच्या मोठ्या गावात तमाशाचे खेळ यायचे. तशा जाहिरातीचे कागद मी लहान असताना वाचत होतो. संध्याकाळी गावातून अनेक लहानमोठी मुले व माणसे हे तमाशाचे खेळ पाहायला शेजारच्या गावाला जात होती. मी ते खेळ पाहायला मुलांबरोबर जाण्याचा हट्ट घरी करत होतो. पण वडील मात्र ते तमाशाचे खेळ पाहायला बाहेरगावला जाऊ देत नव्हते. 'तमाशा' हा सभ्य माणसाने पाहण्यासारखा विषय नाही असा माझ्या वडिलांचा समज होता. आणि माझ्यामध्ये त्यांना तेव्हाच सभ्यपणाची लक्षणे दिसली असावी.

याचवेळी गावातील काही हौशी लोकांनी गावात 'गंगासागर' ह्या लोकनाट्याचा प्रयोग करण्याचे ठरविले. तेव्हा श्रीगुरूदेव सेवा मंडळातील लोकांनी तीव्र नापसंती दर्शविली. पण हौशी लोकांनी हार मानली नाही. मग लोकवर्गणी काढायला सुरूवात झाली. मला आठवते त्यावेळी दोन रूपये वर्गणी द्यावी अशी अपेक्षा होती. कोणी दिली तर कोणी नाही. पण शेवटी एकदाचे नाटक करायचे ठरले. 'गंगासागर' ह्या लोकनाट्याचा प्रयोग पाहायला आजुबाजूच्या सिरसगाव, निधा, मानकापूर, काचनगाव, गावातील फार थोडी मंडळी, गावातील सगळे स्त्री–पुरूष; व काही प्रमाणात गुरूदेव सेवा मंडळातील सुरूवातीला विरोध करणारी मंडळीही होती. माझे वडील खेळ पाहायला आले नव्हते, असे मला आजही आठवते. त्यांच्या मतानुसार

गंगासागर, तमाशा व तशाप्रकारचे खेळ म्हणजे काही तरी 'वायशी' (वाईट) हा प्रकार होता.

माझ्या गावापासून सरळ वाटेने गेल्यास तीन ते चार किलोमीटर अंतरावर 'निधा' नावाचे गाव आहे. भोई, गोंड, कुणबी, तेली, माळी, कोष्टी, अशा अनेक आडजाती असलेले हे लहानशे गाव. तेथील काही हौशी लोकांनी हे गंगासागर नाटक बसविले होते. त्याचाच प्रयोग ते माझ्या गावात दाखविणार होते. रात्रभर चालणारे हे नाटक आहे. गावाच्या जवळचेच सगळे कलावंत असल्यामुळे गावातील लोकांच्या परिचयाचे होते. नाटकात त्यांचा अस्सल गावरान रांगडा अभिनय; व मनात येईल तेव्हा व तसा विनोद करून त्यांनी बरेच नाव कमावले होते. खरं सांगायचं म्हणजे माझ्यासारख्या लहान मुलांना त्यावेळी गंगासागर नाटकाचे कथानकच समजले नव्हते. माझ्यासारखे असे अनेक मोठेही बायामाणसे असेल त्यांनाही कथानक समजले नव्हते. तसे पाहता कथानक न समजल्यामुळे कोणाचे काही अडत नव्हते. सोंगं पाहूनही अनेक लोकांचे समाधान होत होते. पण त्यातील गाणे मात्र सरळ सरळ व सोपे असल्यामुळे आम्ही लहानपणी ते म्हणत होतो. अनेक लहानमोठ्या मुलांना व माणसांना तालीम न करताही गंगासागरचे गाणे पाठ झाले होते.

'निधा' गावाप्रमाणेच अनेक गावातील लोकांनीही हे नाटक बसविले होते. त्यातील काही कलावंताना हे नाटक तुम्ही कोठून आणले असे विचारले. तेव्हा 'आपटी' या गावावरून हे नाटक आणल्याचे त्यांनी सांगितले. हे लोकनाट्य असल्यामुळे त्याची लिखित संहिता कुठेही मिळत नाही. लिखित संहिता नसल्यामुळे त्याचा मूळ लेखक कोण आहे याचाही शोध लागत नाही. मात्र १९७५ च्या मागेपुढे गंगासागर ह्या नाटकाचे खेळ गावागावात होत होते. अनेक गावातील लोकांनी स्वत:च हे नाटक बसविले होते. गणपती, दुर्गादेवी, दसरा, होळीचा पाडवा, गुढीपाडवा किंवा हौसेखातर कोणत्याही दिवशी त्याकाळात गंगासागरचे खेळ होत होते. गावात असे कार्यक्रम बहुतेक उन्हाळ्याच्या दिवसात व्हायचे. त्यावेळी गावात मनोरंजनाची कोणतीही आधुनिक माध्यमे नव्हती. गावगाड्यात क्वचित ठिकाणी एखादा खरखर वाजणारा रेडिओ सोडला तर मनोरंजनाच्या बाबतीत सर्व सपाट होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या, एम, ए, मराठी, भाग १ च्या 'मराठी लोकसाहित्य' या विषयाच्या अभ्यासक्रमात 'गंगासागर' हे लोकनाट्य ठेवले होते. पण ते पुस्तकरूपाने कोठेही उपलब्ध नसल्यामुळे काही वर्षांनी ते अभ्यासक्रमातून काढून टाकावे लागले. हे सुंदर असे लोकनाट्य

लिखित संहिता नसल्यामुळे बदलत्या काळात नामशेष होणार होते. म्हणून ते पुस्तकरुपाने जतन करून ठेवण्याचे मी अगोदरच ठरविले होते. इ. स. २००७ पासूनच हे लोकनाट्य मिळविण्याच्या कामाला मी लागलो होतो. कसेही करून 'गंगासागर' हे लोकनाट्य पुस्तकरूपाने आणायचे असे मी माझ्या मनाला सांगत होतो. त्या पुस्तकासाठी माझा प्रवास सुरू झाला होता.

जेव्हा मी 'निधा' गावातील लोकांना भेटलो व गंगासागरबद्दल विचारले. तेव्हा ते म्हणाले की, आम्ही पस्तीस वर्षापूर्वी हे नाटक बसविले होते. आता आम्ही कधीचेच हे नाटक करायचे सोडून दिले आहे. त्यातील नाटकात काम करणारे काही जेष्ठ नागरिक आहेत, तर बरेच जन गाव सोडून कामधंद्यासाठी शहरात गेले. तर काही कायमचेच गेले. आज जे आहे ती त्यावेळी नाटकात काम करणारी तरूण मुले होती. ते आज आजोबा झालेले आहे. आता नाटकाचा कोणताही भाग कोणालाही येत नाही व आठवतही नाही. त्यांच्या तोंडून असे शब्द ऐकल्यावर मला फार वाईट वाटत होते. कारण त्यावेळपर्यंत मला लोकसाहित्याचे महत्त्व कळले होते.

ज्या ज्या गावाला जाण्याचा योग येईल तेथे मी 'गंगासागर' नाटकाबद्दल चौकशी करीत होतो. वर्धा जिल्ह्यात 'अल्लीपूर' नावाचे एक मोठे गाव आहे. तेथील काही हौशी लोकांनी गंगासागर नाटक बसविले होते असे कळले. पण आता मात्र तेही त्याचे खेळ करीत नव्हते. मी त्यांच्या प्रमुखाला इ. स. २०११ मध्ये भेटलो; व त्याचे महत्त्व समजून सांगितले. तेव्हा त्यांनी दिवाळीला हे नाटक करू असे सांगितले; व सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले. मी सर्व तयारी केली; पण वेळेवर त्यांनी त्यादिवशी 'खंजरी भजन स्पर्धा' ठेवली. माझा खूपच हिरमोड झाला व वाईट वाटले. ही एक चांगली संधी होती असे मला वाटले होते. आणि पुढे अशी संधी मिळणार की नाही याची शाश्वती नव्हती.

पण येवढ्याने मी हार मानणारा नव्हतो. लोकसाहित्याचे संकलन करताना किती अडचणी व प्रसंगांचा सामना करावा लागतो, हे माझ्या 'स्त्रियांची गाथा' या पहिल्या पुस्तकाच्या वेळी मी अनुभवले होते. कॉलेजमध्ये 'लोकसाहित्य' शिकवत असताना प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांना गंगासागर नाटकाबद्दल विचारत होतो. तुमच्या गावात हे नाटक आहे का? तुम्ही हे नाटक पाहिले का? या नाटकाचे खेळ होतात काय? तुम्हाला याबद्दल काय माहिती आहे, असे विचारत होतो. पण प्रत्येकाकडूनच नाहीचे उत्तर मिळत होते. सत्र २०१२–२०१३ ला एम. ए. भाग १ मराठी च्या वर्गात 'गंगासागर' ह्या

लोकनाट्याची माहिती सांगत होतो. ते आता कसे लुप्त झाले आहे असे सांगत असतानाच तुम्हाला जर याची कोठे माहिती मिळाली तर मला फोन करून सांगा, असेही तासाच्या शेवटी म्हणालो. तेव्हा सोनाली बटाले व रोशनी महाजन यांनी त्यांच्या गावाला हे नाटक करणारी मंडळी आजही आहे असे सांगितले. क्षणभर विश्वासच बसत नव्हता. मी त्यांना पुन:पुन्हा तेच विचारत होतो; पण त्यांचे उत्तर ठाम होते.

वर्धा शहरापासून दहा–पंधरा किलोमीटर अंतरावर 'क्षीरसमुद्र' नावाचे गाव आहे. त्या गावावरूनच ह्या दोन मुली यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे शिक्षणासाठी येत होत्या. त्यांच्या मदतीनेच ह्या नाटकाचा प्रयोग करून घ्यायचा होता. सोनाली बटालेचे वडील श्री मारोतराव बटाले त्या नाटकात भूमिका करीत होते. त्यामुळे नाटकाचा प्रयोग करणे सोपे होणार होते. सोनाली व रोशनी यांना वारंवार नाटकाच्या प्रयोगाबद्दल सांगत होतो. त्यांच्यामुळे दसऱ्याच्या दिवशी संध्याकाळी प्रयोग करण्याचे ठरले. ह्या दोघींनी मदत केली. ह्या पुस्तकातील फोटो याच गावच्या (क्षीरसमुद्र) कलावंताचे आहे.

गावातील सगळ्या कलावंतांनी अगदी आनंदाने आणि उत्साहाने त्यात भाग घेऊन हे नाटक केले. माझ्या मानपानात काहीही कमी पडू दिले नाही. रात्रभर म्हणजेच पहाटे पाच वाजेपर्यंत प्रयोग झाला. प्रयोग झाल्यावर श्री मारोतराव बटाले म्हणाले, 'सर, आम्ही जेव्हा हे नाटक बसवले तेव्हा पंचवीस–तीस वर्षाचे होतो'. आता त्यांचे वय साठच्या पुढे असावे. त्या मंडळीतील काही कलावंताचा मृत्यू झाला असल्याचेही त्यांनी सांगितले. ज्या कलावंताचा मृत्यू झाला ते स्त्री–पात्राची भूमिका करीत होते. त्यांच्यानंतर कोणीही मिशी भादरायला तयार नव्हते. शेवटी त्यांच्यातीलच काही लोकांनी त्यांच्या मुलांनाच ह्या प्रयोगासाठी तयार केले. त्यांच्या मिशा बोडून व साडी नेसवून त्यांना रंगमंचावर आणले. त्या मुलांची रंगमंचावर येण्याची ती पहिलीच वेळ होती. स्त्री–पात्रांची भूमिका करणाऱ्या तीनही मुलांचे वय विशीच्या आत असावे. त्या मुलांना एकही संवाद पाठ नव्हता. तालीम तर झालीच नसावी. आणि अभिनयाच्या बाबतीत तर न बोललेलेच बरे. त्यांच्यासोबत असलेले जेष्ठ कलावंत हातवारे करून त्यांना सांगत होते. त्यांचे संवादही तेच सांगत होते; व कधी म्हणत होते. ती मुले फक्त स्त्रीपात्र म्हणून उभे होते. माझ्यासाठी त्यांनी हे सर्व केले होते. त्यातील तीन कलावंत आलटून पालटून वेश बदलवून वेगवेगळ्या भूमिका करीत होते. आज त्यांचे वय पासष्ट ते सत्तरच्या जवळपास आहे. रात्रभर गायन व वादन करणारी

मंडळी होती. शेवटी एक प्रयोग घडून आला. त्यानंतर हा प्रयोग असाच पुढे फार दिवस होईल असे मला वाटत नाही. कारण ज्यांना संवाद व गाणी येत होती, ते फक्त तीन चार लोक रंगमंचावर होते.

गंगासागर नाटकाची लिखित संहिता तयार करणे फार अवघड काम होते. कारण जो प्रयोग झाला त्यातील बऱ्याच भागाची धरसोड करण्यात आली होती. अशी लिखित संहिता मिळवणे फारच कठीण काम आहे. कारण आता सगळीकडे गंगासागरचे प्रयोग करणे जवळ जवळ बंद झाले आहे. क्षीरसमुद्र व निधा या गावातील कलावंतांकडेही लिखित संहिता नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे गंगासागरची संहिता मिळेल की नाही याची शाश्वती देता येत नव्हती. पण माझे प्रयत्न सुरूच होते.

एक दिवस वंदना लक्ष्मणराव डांगरी या माझ्या विद्यार्थीनीने, तिचे मामा श्री सुरेशराव बोरकर (अल्लीपूर) यांच्याकडे गंगासागरबद्दल बरीच माहिती मिळू शकते असे सांगितले. त्यांच्याकडे काही लिखित माहितीही मिळू शकेल असे म्हणाली. मी सुरेशरावांना भेटून त्यांच्याकडून त्यांना पाठ असलेले संवाद लिहून घेतले. त्यासाठी वंदनाची फार मोठी मदत झाली. अशा स्वरूपात गंगासागरची एक लिखित संहिता तयार झाली. त्यातही बऱ्याच चुका होत्या. पात्रांचे संवाद बदललेले होते. पात्र एक व संवाद दुसऱ्या पात्राचे अशी थोडीफार सरमिसळ होती.

आता मला त्याची पद्धतशीर मांडणी करायची होती. त्यासाठी मी बरेच दिवस त्याचे वाचन केले. नंतर एका एका पात्राचे संवाद वेगळे लिहून काढले. काही पात्रांचे बदललेले संवाद त्या त्या पात्रांच्या तोंडी घातले. त्यासाठी क्षीरसमुद्रच्या मंडळींनी केलेल्या प्रयोगाची बरीच मदत झाली. अल्लीपूरचे सुरेशराव बोरकर हे स्वत: त्या नाटकात गंगासागर राणीची भूमिका करीत होते. त्यामुळे राहिलेल्या चुका, पात्रांच्या तोंडचे सुटलेले संवाद कळण्यास त्यांच्याकडून मदत झाली. क्वचित काही शब्दांचे अर्थ आजही कळत नाही. क्षीरसमुद्रच्या मंडळींना व सुरेशराव यांना विचारले तर तेही त्याबद्दल वेगळे सांगत नाही. पण त्यामुळे आता काहीही अडून राहात नाही. नाटकाचे कथानक समजेल एवढी संहिता मात्र आज तयार आहे. हे चार अंकी लोकनाट्य पुस्तकरूपाने तयार झाले. मराठी भाषेतील एक सुंदर लोकनाट्य अनेक लोकांच्या प्रयत्नाने नष्ट होता होता वाचले, याचा मला मोठाच आनंद वाटतो.

**डॉ. एन. एच. खोडे**
९८५०५३७६१५

**गंगासागरचे कथानक** :— 'शंकावती' नगरीचा राजकुमार आपला प्रिय मित्र बिरबल याला सोबत घेऊन शिकार करण्यासाठी वनात जातो. वनात भटकंती केल्यानंतर बिरबलला एका ठिकाणी थांबवून राजकुमार पाणी पिण्यासाठी निघून जातो. पाण्याच्या ठिकाणाजवळच राजकुमाराला एक 'वनदेवीचे' देऊळ दिसते. योगायोगाने 'पद्मावती' नगरीचा राजा 'दंतपाल' त्याच वनामध्ये वनदेवीच्या दर्शनाला जाण्याचा विचार आपल्या शिपायाला बोलून दाखवतो. तेवढ्यात दंतपाल राजाची कन्या 'पद्मा' तेथे येते; व मलाही वनदेवीच्या दर्शनाला घेऊन चला असा राजाजवळ हट्ट करते. राजा दंतपाल आपल्या लाडक्या पद्माला सोबत घेऊन वनदेवीच्या दर्शनाला जातो. वनात वनदेवीच्या मंदिराजवळ आल्यावर अचानक राजाला शिकार करण्याचा मोह होतो. राजकुमारी पद्माला वनदेवीच्या देवळाजवळ ठेवतो; व शिपायासोबत राजा शिकारीला निघून जातो. इकडे शंकावती नगरीचा राजकुमार पाण्याच्या शोधात वनदेवीच्या देवळाजवळ येतो. तेव्हा त्याला सुंदर अशी राजकन्या पद्मा त्याच्या दृष्टीस पडते.

राजकुमार पाणी पिऊन परत आल्यावर आपला मित्र बिरबल याला सांगतो की, 'मित्रा, मी आज एक सुंदर मुलगी पाहिलेली आहे. ती मला अत्यंत आवडलेली आहे, आणि मला ती पत्नी म्हणून हवी आहे. नंतर बिरबल आणि राजकुमार त्या मुलीच्या शोधात निघतात. बिरबल राजकुमाराला विचारतो की, ती मुलगी तेथे काय करीत होती. त्यावर राजकुमार म्हणतो की, 'तिने डोक्याचे फूल काढून कानाला लावले, आणि कानाचे फूल काढून दाताला लावले; व दाताचे फूल पायावर टाकले'. असे सांगितल्यावर बिरबल त्या मुलीचा पत्ता सांगतो. डोक्याचे फूल कानाला लावले म्हणजे तिच्या नगरीचे नाव 'करनाटक' असावे. व कानाचे फूल दाताला लावले म्हणजे तिच्या वडिलाचे नाव 'दंतपाल' असावे, तसेच तिने दाताचे फूल पायावर टाकले म्हणजे तिचे नाव 'पद्मा' असले पाहिजे.

राजकुमार व त्याचा मित्र बिरबल दोघेही पद्मावती नगरीत तिचा शोध घेण्यासाठी येतात. पद्मावती नगरीत आल्यावर त्यांना नगराच्या कडेला एक झोपडी दिसते. त्या झोपडीत एक म्हातारी राहात असते. बिरबल व राजकुमार दोघेही त्या झोपडीत रात्री मुक्काम करतात. म्हातारीच्या सहाय्याने पद्माच्या राजवाड्याचा पत्ता शोधतात. म्हातारीच्या द्वारे तिला निरोप पाठवितात.

सुरुवातीला म्हातारी तयार होत नाही; पण दोघेही तिला पैशाचे आमिष दाखवितात. नंतर म्हातारी तयार होते.

म्हातारी पद्मावतीच्या वाड्यात जाते आणि सांगते की, 'पद्मा, तुला जो तरूण वनदेवीच्या देवळात भेटला होता, 'तो तुझी पाखरावानी वाट पाहात आहे'. असे म्हातारीने सांगताच पद्मावतीला राग येते; व ती म्हातारीला बदडते. त्यानंतर राजकुमार स्वतःच पद्मावतीच्या वाड्यात जाऊन तिची भेट घेतो. आपण म्हातारीला पाठविण्याऐवजी स्वतःच का नाही आलात असे पद्मा राजकुमाराला विचारते; व आता आपणास वेळ नाही, तुम्ही उद्या सकाळी नऊ वाजता भेटायला येण्याचे सांगते.

दुसऱ्या दिवशी बिरबल आपल्या मित्राला सोबत त्रिशूळ घेऊन जायला सांगतो. आणि म्हणतो की, 'तिच्या गळ्यातला नवरत्नाचा हार तिला माहित न होता काढून घे; व तिच्या डाव्या भुजेवर त्रिशुळाने खूण करून परत ये'. ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी राजकुमार पद्मावतीच्या वाड्यात प्रवेश करतो. रात्रीच्या जागरणामुळे पद्मावतीच्या डोळ्यात झोप असते. ती बोलण्याच्या मनस्थितीत नसते. तिला असे झोपलेली पाहून राजकुमार तिच्या गळ्यातला नवरत्नाचा हार काढून घेतो; व तिच्या डाव्या भुजेवर त्रिशुळाने खूण करून आपल्या मित्राकडे परत येतो.

पद्मावती झोपेतून जागी झाल्यानंतर तिच्या असे लक्षात येते की, तिच्या गळ्यात नवरत्नाचा हार नाही. तिला असे वाटते की, गळ्यातील हार राजकुमाराने चोरून नेला असावा. पण तो राजकुमार आहे. तो कशाला हार चोरून नेईल. हा हार त्या म्हातारीने म्हणजेच ठकाई मावशीने (पद्मा म्हातारीला ठकाई मावशी म्हणून संबोधते) चोरला असावा असे समजून तिच्या झोपडीची तलाशी घेते. हार दिसत नसल्यामुळे ती कासावीस होते. आता राजेसाहेब आपल्यावर रागावतील अशी तिला भिती वाटते. आपला हार चोरीला गेला असे वडिलांना सांगायची तिला हिंमत होत नाही. म्हणून ती ठकाई मावशीकडून आपल्या वडिलाला कळविते. राजा दंतपालाला ही माहिती मिळताच तो शिपायाला बोलावून नगरीत दवंडी द्यायला सांगतो; व जो कोणी हा नवरत्नाचा हार आणून देईल त्याला दहा हजाराचे बक्षीस जाहीर करतो.

इकडे बिरबल तो नवरत्नाचा हार घेऊन तिच्याच नगरीत (पद्मावती) एका शेटजीकडे विकायला आणतो. आणि आपला मित्र राजकुमाराला शंकराचे तप करीत स्मशानात बसवतो. (त्यामागे बिरबरलची एक धूर्त चाल असते)

शेटजीच्या वाड्यात आल्यावर हाराचा सौदा सुरू होतो. त्या दरम्यान दंतपाल राजाचा शिपाई तेथे पोहोचतो. शेटजी व बिरबल दोघेही हा हार आपला नाही म्हणून शिपायाला सांगतात. पण शेवटी 'परदेशी' असे नाव धारण करून असलेल्या बिरबलला शिपाई पकडतो. 'हा हार मला माझ्या गुरूने दिला; व तो आता स्मशानात तप करीत असल्याचे बिरबल शिपायाला सांगतो. शिपाई बिरबलला घेऊन स्मशानात येतो. येथे राजकुमार शंकराचे तप करीत बसल्याचे नाटक करत असतो. हा हार शंकराचे तप करीत असताना एका भुताने मला दिला, व आपण त्या भुताच्या डाव्या भुजेवर एक त्रिशुळाची खूण केल्याचे राजकुमार शिपायाला सांगतो. शिपाई ही बातमी आपल्या दंतपाल राजाला सांगतो.

दंतपाल राजा आपल्या शिपायाला आदेश देतो; व आपल्या नगरात प्रत्येक स्त्री–पुरुषांच्या भुजेवर त्रिशुळाची खूण आहे का, हे पाहाण्यासाठी पाठवितो. शिपाई नगरातील सर्व स्त्री–पुरुषांच्या भुजा तपासतो; पण कोणाच्याही भुजेवर तशी खूण नसते. नगरातील सगळ्या स्त्री–पुरुषांच्या भुजा पाहिल्या का? असे राजा विचारतो. राजवंशातील लोकांच्याही भुजा पाहण्याचा आदेश राजा शिपायाला देतो. लाडक्या राजकन्येलाही त्यातून सूट मिळू नये म्हणून तिच्याही भूजा पाहाण्याचा आदेश देतो. सगळ्यासाठी सारखा कायदा असावा असा राजाचा हेतू असल्यामुळे शेवटी राजा आपल्या मुलीलाही त्यातून सूट देत नाही. तिच्याही भुजा पाहायला सांगतो. शिपायाला पद्मावतीच्या डाव्या भुजेवर त्रिशुळाची खूण दिसते. शिपाई ही माहिती राजाला सांगतो. मुलीने आपल्या कुळाला कलंक लावला आहे, ती पिशाच्च आहे, असे समजून राजा आपल्या शिपायाला आदेश देतो की, 'हिला वनात नेऊन ठार कर'. राजाच्या आज्ञेप्रमाणे शिपाई पद्मावतीला वनात ठार मारण्यासाठी नेतो. पण त्याला दया येऊन तो तिला सोडून देतो. एका हरणीची शिकार करून रक्ताने माखलेली तलवार राजाला दाखवतो.

राजकुमारी पद्माला अरण्यात सोडून दिल्यावर शिपाई आपल्या नगराला (पद्मावती नगरी) परत येतो. अरण्यात पद्मा ही वनदेवीच्या देवळाच्या आश्रयाने दिवस काढते. तेवढ्यात शंकावती नगरीचा राजकुमार व त्याचा मित्र बिरबल आपल्या शिपायासोबत त्या वनात शिकार करायला येतात. तेथे राजकुमाराला ती दिसते. तू येथे कशी आलीस असे राजकुमार तिला विचारतो. 'तुम्ही माझा नवरत्नाचा हार नेला, त्यामुळे माझ्यावर अशी वनवासी होण्याची वेळ तुमच्यामुळे आली', असे राजकुमारी सांगते. तेव्हा राजकुमार

पद्मावतीसोबत तेथेच वनदेवीच्या देवळात विवाह करतो. राजकुमार व पद्मा वनदेवीला नमस्कार करतात. वनदेवी प्रसन्न होते. ती दोघांनाही आशीर्वाद देते. आणि म्हणते, 'राजकुमार, तू मला एखाद्या संतासारखा सज्जन दिसतो. म्हणून आज मी तुझे नाव 'संतसेन' असे ठेवते. व पद्मा तू गंगेसारखी निर्मळ आहे; व सागरासारखी विशाल मनाची आहे, म्हणून तुझे नाव 'गंगासागर' असे ठेवित आहे. आणि राजा तुला सोबत म्हणून तू आपल्या मित्राला (बिरबल) दिवाण म्हणून ठेव'. गंगासागर वनदेवीला आरती करते. येथे पहिला अंक समाप्त होतो.

दुसऱ्या अंकाची सुरूवात दिवाण आणि शिपायाच्या गाण्याने सुरू होते. त्यात संतसेन राजा व गंगासागर राणीचा परिचय असतो. 'सर्व प्रजाजनांना कळविण्यात येत आहे की, 'आजपासून माझा मित्र राजा झाला आहे; व मी त्याचा दिवाण झालो आहे. आणि सोबत शिपाई सरदार आहे' असा त्या गाण्याचा आशय असतो. राजा संतसेनही मोठा आनंदी असतो. आपल्या मित्राला दिवाण नेमतो. त्याला टोप आणि पोशाख देतो. आणखी त्याच्या सोबतीला शिपाई देतो.

एक दिवस राजा संतसेन आपल्या लाडक्या गंगासागर राणीला विचारतो की, 'तू दु:खी आणि खिन्न का आहेस'. तिच्या दु:खाचे कारण विचारतो. 'आपल्या लग्नाला बरीच वर्ष झाली; पण आपल्याला संतती नाही. आपल्या वाड्यासमोरच्या बायांना मुले आहेत; आणि त्या मला येऊन बोलतात', असे गंगासागर राणी राजाला सांगते. त्याचबरोबर राजाने जोतिष्य पाहावे म्हणून विनंती करते. जोतिष्य महाराजांना वाड्यात आणण्यास राजा दिवाणाला सांगतो. जोतिष्य राजाचा हात पाहतो. आपल्याला धनद्रव्याला काही कमी नाही; पण आपल्या पोटी पुत्रफळ नाही, असे जोतिष्याने सांगितल्यावर राजा त्यावर उपाय विचारतो. 'महाराज, आपण सहा महिने अरण्यात जाऊन शंकराचे तप केल्यास तुम्हाला पुत्रफळ लाभेल', असे जोतिष्याने सांगितल्यावर राजा शंकराची तपश्चर्या करण्यासाठी अरण्यात सहा महिण्यासाठी निघून जातो.

भगवान शंकराची खडतर अशी तपश्चर्या करीत असता श्रीशंकराचे आसन डोलायला लागते. पृथ्वीवर असा कोण राजा तपश्चर्या करीत आहे की, त्याने माझे सिंहासन डोलायला लागले. राजाचे तप पाहून भगवान शंकरजी प्रसन्न होतात. आणि राजाला विचारतात की, 'तुला काय पाहिजे'? 'माझ्याजवळ धनद्रव्याला काहीच कमी नाही; पण पोटी संतान नाही. म्हणून

देवा पुत्र मागायला आलो' असे राजा भगवान शंकराला सांगतो. शंकरजी म्हणतात, 'राजा, तुझ्या पोटी संतती आहे; पण ते फार कठीण आहे'. कोणतीही कठीण गोष्ट करण्याची राजा तयारी दाखवतो. शंकराला तसे वचन देतो. शंकरजी म्हणतात, 'राणीला सहा महिण्याचा गर्भ राहिल्यावर तुला स्वर्गात यावे लागेल'. राजा तसे वचन भगवान शंकराला देतो.

राजा संतसेन सहा महिने खडतर अशी शंकराची तपश्चर्या करून आणि शंकराचा संतती मिळण्याचा वर घेऊन आपल्या शंकावती नगरीला परत येतो. आपल्याला संतती होणार अशी बातमी राजा आपल्या लाडक्या गंगासागर राणीला देतो. राणीला सहा महिण्याचा गर्भ राहिल्यावर मला स्वर्गाला जावे लागेल, ही गोष्ट राजा गंगासागरला सांगत नाही. गंगासागरला दिवस जातात. राजा व राणी दोघेही आनंदात असतात. गंगासागर राणीला सहावा महिना लागताच राजा स्वर्गाला जाण्याची तयारी करतो. आपला मित्र बिरबल याच्या हाती राज्य व प्रजा सोपवून राजा स्वर्गाला निघून जातो. येथे दुसरा अंक समाप्त होतो.

राजा संतसेन आपले राज्य व प्रजा दिवाणाच्या हाती सोपवून स्वर्गाला निघून जातो. आपल्यानंतर प्रजाजन सुखी ठेवावे; व राजपुत्र जन्माला येईपर्यंत हे राज्य सांभाळावे असे राजा दिवाणाला सांगतो. राजा स्वर्गाला निघून गेल्यावर दिवाणाच्या मनात राज्य हडपण्याचा मोह उत्पन्न होतो. आता आपणच या राज्याचे मालक आहोत, अशा थाटात दिवाण वावरत असतो. लगेच ही बातमी तो आपल्या कमलावतीला (पत्नीला) जाऊन सांगतो. आपण आता राजाराणी बनून या राज्याचा व प्रजेचा सांभाळ करू असे म्हणतो. 'हे राज्य आपले नसून त्या गंगासागर राणीचे आहे' असे कमलावती आपल्या पतीला म्हणजेच दिवाणाला सांगते. पण सत्तेच्या मोहाने बेहोश झालेला दिवाण गंगासागर राणीलाच वाड्याच्या बाहेर काढून देण्याची धमकी देतो. कमलावती दिवाणाला समजावण्याचा प्रयत्न करते; पण दिवाण समजण्याच्या स्थितीत नसतो. आपल्या पत्नीची विनंती तो धुडकावून लावतो.

इकडे राजा स्वर्गात गेल्याची बातमी कमलावती गंगासागरला सांगते. पण गंगासागर राणीचा त्यावर विश्वास बसत नाही. ती दिवाणाला ही हकिकत विचारायला त्याच्या वाड्यात जाते. येथे दिवाण गंगासागर राणीचा अपमान करतो; व 'तुने गुराख्याचे पोट आणले' असा तिच्यावर आरोप करतो. तिला मारहाण करून वाड्याबाहेर हाकलून लावतो. लगेच शिपायाला बोलावतो; व गंगासागर राणीला वनात नेऊन ठार मारण्याचा आदेश देतो. त्यावेळी गंगासागर

राणीला सहा महिण्याचा गर्भ असतो; आणि दिवाण सत्तेच्या धुंदित वावरत असतो. शिपाई गंगासागरला ठार मारण्यासाठी वनात नेतो. त्याला राणीची दया येते. तो तिला ठार न मारता वनात सोडून देतो; व आपल्या नगराला वापस येतो. आपण गंगासागरला ठार मारले असे शिपाई दिवाणाला सांगतो. यावर प्रसन्न होऊन दिवाण शिपायाला दहा एकर जमीन बक्षीस देतो.

पुढे गंगासागर राणी फाटके वस्त्र नेसून फिरत फिरत पद्मावती नगरीत तिच्या माहेरी येते. तेथे काही वढर (दगड मातीचे काम करणारी एक जमात) धर्मपाल राजाच्या दिवाणाच्या कचेरीसमोर उभे राहून दिवाणासोबत बोलत असतात. वढर आपल्या कामाचे पैसे घेऊन जात असताना त्यांना गंगासागर अत्यंत दरिद्री अवस्थेत दिसते. वढरं तिला सोबत घेऊन तिची विचारपूस करतात. गंगासागर आपला खरा परिचय देत नाही. 'माझे नाव बेबीनंदा असून मी एक वनवासी आहे'. येवढाच परिचय ती वढरांना देते. वढर तिला आपल्यासोबत कामाला घेतात. काम झाल्यावर कामाचे पैसे मागण्यासाठी वढर दिवाणाकडे जातात. स्वत:च्या मजुरीचे पैसे घेतल्यावर वढर बाईच्या मजुरीचे पैसे मागतात. पण ज्याची मजुरी त्यालाच देण्यात येईल म्हणून तुम्ही तुमच्या बहिणीला मजुरीसाठी राजाकडे पाठवून द्या, असे दिवाण वढरांना सांगतो. तेव्हा बाई राजासमोर कामाचे पैसे मागते. राजा तिला नाव गाव विचारतो. ती संपूर्ण हकिकत राजाला सांगते. धर्मपाल राजा (दंतपाल राजाचा पुत्र) तिला ओळखतो. आणि 'आपण बहीण भाऊ आहोत' असे म्हणून तिला स्वीकारतो. आपण अर्धे अर्धे राज्य वाटून घेऊ म्हणतो. तिला आपल्या जवळ ठेवतो.

एक दिवस शंकावती नगरीच्या दिवाणाला गंगासागर राणी जिवंत असल्याचे स्वप्न पडते. तो शिपायाला बोलावतो. तू 'गंगासागर राणीला वनात ठार न करता तिला जिवंत का सोडलेस' असा जाब विचारतो. 'तू धोकेबाज आहेस' असे म्हणून त्याची निर्भत्सना करतो. गंगासागरचा शोध घेऊन आपण तिला ठार केले पाहिजे या उद्देशाने दिवाण व शिपाई दोघेही गोरक्षनाथाचे सोंग घेऊन गंगासागरला शोधायला निघतात. येथे तिसरा अंक समाप्त होतो.

शिपायासोबत दिवाण गोरक्षनाथाचे सोंग घेऊन, दाढी व जटा वाढवून नगर नगर पालथी घालतात. परंतु त्यांना कोठेच गंगासागरचा पत्ता मिळत नाही. शेवटी त्यांना एक नगरी दिसते. त्या नगरीत दोघेही येतात. ज्या नगरीत ते येतात ती दंतपाल राजाची पद्मावती नगरी असते. तेथे दंतपाल राजाचा पुत्र 'धर्मपाल' हा राज्य करीत असतो. तेथेच गंगासागर आपल्या भावाजवळ (धर्मपाल) दिवस काढत असते. गोरक्षनाथाचा वेश घेतलेले शिपाई व दिवाण

या दोघांनाही राजा भेटीला बोलावतो. कुशलमंगल विचारल्यावर राजा आपल्या बहिणीला (गंगासागरला) बोलावून सांगतो, 'बाई, आज आपल्या घरी नवनाथापैकी दोन गोरखनाथ आले आहेत, तरी तू त्यांच्या भोजनाची लवकर तयारी कर. गंगासागर लवकर भोजन तयार करून त्या दोन गोरक्षनाथांना जेवायला देते. जेवन करत असताना गोरक्षनाथाच्या वेशात असलेले दिवाण व शिपाई दोघेही तिला ओळखतात. ज्या कामासाठी ते निघालेले असतात तो बेत त्यांचा सफल होतो. धर्मपाल राजा त्या दोन गोरक्षनाथांना पोवाडा म्हणायला सांगतो. पोवाडा म्हणत असताना ते गंगासागरबद्दल खोटी माहिती सांगतात. 'या बाईने गुराख्याचे पोट आणले आहे, म्हणून या बाईला जवळ ठेवू नको' असे ते राजाला सांगतात. धर्मपाल त्या गोरक्षनाथांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवतो. धर्मपाल राजाला आपल्या बहिणीचा राग येतो. तो गंगासागरला वाड्याबाहेर हाकलून लावतो. गंगासागर आपल्या भावाला समजावण्याचा खूप प्रयत्न करते. 'आपल्या पोटातला गर्भ हा गुराख्याचा नसून तुझ्या भाटव्याचा आहे' म्हणून सांगते. पण धर्मपाल राजा तिचे ऐकत नाही. तू माझ्या राजवंशाला डाग लावला आहेस, तू कलंकिणी आहेस, असे म्हणून तिला बाहेर काढून देतो. त्यावेळी ती नऊ महिण्याची गरोदर असते. ती भगवान शंकराचा धावा करते. अशा कठीण समयी शंकराला मदतीसाठी विनंती करते.

(रंगमंचावर शंकराचा प्रवेश होतो. शंकर व पार्वतीचे संवाद ऐकायला येतात) शंकरजी मृत्युलोकात गमन करण्यास निघतात. पार्वतीही शंकराला सोबत नेण्याची विनंती करते. आपणही मृत्युलोकात येऊन लोकांचे कौतुक पाहू म्हणून पार्वतीही शंकरजीसोबत मृत्युलोकात येते. वनात शंकर व पार्वतीचे आगमन होते. त्याच ठिकाणी गंगासागर राणीचे बाळंतपण होते. येथे कोण्यातरी स्त्रिचे बाळंतपण झाले आहे म्हणून ती शंकराला थांबायला सांगते व पुढे जाते. तिथे एक बाई बाळंत झालेली पार्वतीला दिसते. पार्वती गंगासागरच्या हातात बाळ देते. शंकरजी व पार्वती तेथून निघून जातात.

आता वनातच गंगासागरचा बाळ लहानाचा मोठा होणार आहे. गंगासागर वनामध्येच आपले बाळ ठेऊन नगराला भिक्षा मागायला येते, व परत जाते. ही सगळी हकिकत ती गाण्यात सांगते. येथे मात्र मन हेलावून टाकणारे वर्णन आलेले आहे. ज्या वनात गंगासागर आपल्या बाळाला घेऊन राहाते. तेथेच शंकावती नगरीचा दिवाण आपल्या शिपायासोबत शिकारीला येतो. त्याच्या दृष्टीस गंगासागर व तिचा बाळ दिसतो. 'तू तुझा बाळ माझ्याकडे दे' असे

दिवाण गंगासागरला सांगतो. 'तू माझा जीव घे, पण माझ्या बाळाला मारू नको' म्हणून गंगासागर दिवाणाला विनवणी करते. पण दिवाण तिचे काही ऐकत नाही. तिच्या हातून तिचे बाळ दिवाण हिसकावून घेतो व शिपायाकडे देतो; व त्याचा शिरच्छेद करण्याचा हुकूम देतो. 'गंगासागरच्या मुलाचा शिरच्छेद केला तर या पापाचा वाटेकरी कोण'? म्हणून शिपाई दिवाणाला विचारतो. शिपाई मुलाला ठार मारण्यास नकार देतो. तेव्हा दिवाण स्वत: गंगासागरचा व तिच्या मुलाचा शिरच्छेद करतो. इकडे शिपाई रागाने 'शिपायाचा पोशाख' फेकून देतो आणि निघून जातो.

थोड्या वेळाने भगवान शंकर व पार्वती मृत्युलोकात गमन करण्यासाठी येतात. वनात पार्वतीला दोन जीव मेलेले दिसतात. पार्वती शंकराला म्हणते, 'देवा, येथे दोन जिवाची हत्या झालेली दिसत आहे. तर तुम्ही त्यांना अमृत पाजून जिवंत करा. शंकरजी अमृत पाजून गंगासागर व तिच्या बाळाला जिवंत करतात. त्यानंतर शंकरजी बाळाला जवळ घेतात. त्याला आपल्याजवळची शक्ती व बळ देतात. तसेच कोणीही याला युद्धात पराजित करणार नाही असा आशीर्वाद देतात. या बाळाचे नाव 'रत्नपाल' ठेव असे गंगासागरला सांगून भगवान शंकरजी पार्वतीसोबत निघून जातात.

गंगासागरचा मुलगा रत्नपाल आता बारा वर्षाचा होतो. तो आपल्या आईला सांगून वनात शिकारीसाठी जातो. त्याच वनात शंकावती नगरीचा दिवाण शिकार करायला येतो. रत्नपालाची वनात दिवाणासोबत भेट होते. दिवाण त्याला त्याच्याबद्दल माहिती विचारतो. पण रत्नपालाला आईशिवाय काहीच माहित नसते. आता गंगासागर त्याला पूर्ण हकिकत सांगते. वनात भेटलेला तोच दुष्ट दिवाण होय. त्याच्यामुळेच आपल्यावर ही अशी वेळ आल्याचे गंगासागर रत्नपालाला सांगते. तो लगेच शंकावती नगरीत येऊन दिवाणासोबत युद्ध करतो; आणि त्याला ठार मारून आपल्या आईजवळ येतो. 'हे राज्य आता आपले आहे', असे आपल्या आईला सांगतो. तू या गादीवर बस; व मामाच्या वाड्याला कोणता मार्ग जातो ते तू मला सांग. असे म्हणून आईवर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्यासाठी पद्मावती नगरीत प्रवेश करतो. रत्नपाल व त्याचा मामा धर्मपाल या दोघांची लढाई होते. शंकरजीने रत्नपालाला बळ व शक्ती दिल्यामुळे तो अजिंक्य असतो. शेवटी मामा धर्मपाल गंगासागरला शरण जातो. गंगासागर रत्नपालाला म्हणते की, 'तुझा मामा तुला शरण आलेला आहे, त्याला तू मरण देऊ नको'. धर्मपाल राजा आपल्या बहिणीला सांगतो की, 'बाई, माझी मुलगी (चंद्रसेना) आता

विवाहयोग्य झाली आहे. रत्नपालाचा चंद्रसेनाबरोबर विवाह होतो. शेवट आनंदाने होतो. ............. पडदा पडतो.

**गंगासागर या लोकनाट्याचा आकृतीबंध :** लोकनाट्य म्हटले की त्या नाट्याचा पूर्वरंग व उत्तररंग असे दोन भाग पडतात. पूर्वरंगात गण, गवळण, आवाहन, नमन, पूजा असते. तर उत्तररंगात आख्यानगायन, सादरीकरण, आरती इत्यादी असते. पूर्वरंगात प्रादेशिक देवदेवतांनाही नमन करून आशीर्वाद घेतल्या जातो. गावपरत्वे ही दैवते बदलत असतात. सर्वसाधारणपणे कोणत्याही लोकनाट्याचा आकृतीबंध पुढीलप्रमाणे असतो.

पूर्वरंग : गण – गवळण – आवाहन – नमन.
उत्तररंग : आख्यान – सादरीकरण – आरती.

गण म्हणजे गणपती स्तवन. गणपतीचे स्तुतीविषयक गीत. भारतात गजाननाला रंगभूमीची देवता मानल्या जाते. आपण करत असलेला खेळ, नाट्य किंवा प्रयोग निर्विघ्नपणे पार पडावा म्हणून सुरूवातीलाच गजाननाला वंदन करून आशीर्वाद मागण्याची प्रथा आहे. गणपती विषयक पदांना गण म्हणतात. गण गायल्यानंतर गवळण गायली जाते. गवळणीत श्रीकृष्णाच्या बाललीला गायल्या जातात. त्यातही गोपी, गवळणी, मावशी, राधा, पेंद्या व कृष्णाचे सवंगडी यांचे वर्णन आढळते. लोकनाट्यात गवळणी ह्या नृत्याभिनयासह रंगभूमीवर सादर करण्याची प्रथा भारतभर आहे. गण आणि गवळण झाल्यावर उत्तररंगात एखादे आख्यान लावले जाते. व त्याला गायन–संगीत–अभिनय–नृत्य इत्यादीसह सादर केले जातात. ('नटरंग' हा तमाशाप्रधान चित्रपट आहे. त्यात लोकनाट्याचा आकृतीबंध फार कलात्मकपणे वापरलेला आहे.)

गंगासागर ह्या लोकनाट्याच्या पूर्वरंगाचा विचार केल्यास येथेही हा आकृतीबंध पाहायला मिळतो. प्रयोगाची सुरुवातच नमनाने होते. गंगासागर नाटकातील सर्व कलावंत हातात पूजेचे ताट घेऊन नमनगीत सादर करतात. त्यात प्रादेशिक देवदेवतांचाही उल्लेख असतो. निधा, अल्लीपूर व क्षीरसमुद्र गावातील कलावंताच्या नमनगीतात सुरूवातीला गणपती; व नंतर सरस्वतीला वंदन आहे. विदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या 'श्रीगुरूदेव सेवा मंडळाचा' व विचारांचा लोकांवर प्रभाव आहे. म्हणून गुरूदेवाला म्हणजेच

तुकडोजी महाराजांना वंदन दिसते. त्यानंतर शंकर–पार्वती, श्रीराम–सिता, पांडव–दौपदी व शेवटी ‘सर्व देवांगणाला’ वंदन झाल्यावर आपण याठिकाणी काय सादर करणार आहोत हेही थोडक्यात सांगितले आहे (गंगासागरचे सुरुवातीचे नमनगीत पाहा).

नमनगीत झाल्यावर लगेच गंगासागरच्या कथानकाला सुरुवात होते. कथानक रात्रभर चालते. लोकनाट्यात वाद्यवृंदांना फार महत्त्व आहे. रात्रभर हे वाद्यवृंद जागून नाट्यात रंग भरतात. गंगासागरच्या उत्तररंगात शेवटी कथानक संपल्यावर आरती होते. सगळे भाग घेणारे कलावंत समोर एका रांगेत उभे राहातात. एका स्त्री–पात्राच्या हातात आरती असते. आरतीमध्ये प्रादेशिक देवदेवता, साधुसंतांचा उल्लेख आहे. अल्लीपूर येथे मिळालेल्या आरतीत पोहणा, शेगाव, कापसी, वायगाव, आजनसरा, पारडी ह्या ग्रामनामाचा उल्लेख आहे. शेगाव वगळता सर्व गावे वर्धा जिल्ह्यातील आहेत. पोहणा या गावाला सोनामायची समाधी आहे. ती जिवंत असतानाच लोक तिच्या दर्शनाला जात होते. तिच्या जिवंतपणीच तिचे नाव आरतीत आलेले होते. कापशी हे गाव वर्धा नदीच्या काठावर असून तेथे नानाजी महाराजांचे भव्य मंदिर आहे. याठिकाणी माघ शु. ७ रथसप्तमीला दहीहांडी होऊन यात्रा प्रारंभ होते. ती पंधरा ते पंचवीस दिवस चालते. आजनसऱ्याला भोजाजी महाराजांचे भव्य मंदिर असून दर बुधवारी तेथे त्यांचे भक्त ‘पुरण पोळी’चा स्वयंपाक करतात. तर नगाजी महाराजांचे प्राचीन मंदिर पारडी गावाला आहे. (ही सर्व गावे लेखकाच्या परिचयाची आहे; व लेखक तेथे जाऊन आलेला आहे). गंगासागर मधील शेवटची आरती पाहिल्यावर परिसरातील लोकांची लोकदेवतांवर असलेली श्रद्धा व्यक्त होते. आरतीत असलेली गावे व तेथील दैवते स्थळानुसार व प्रदेशानुसार बदलत असतात. तात्पर्य, लोकनाट्याचे सर्व गुण गंगासागर या लोकनाट्यात दिसून येतात.

**रंगभूषा व वेशभूषा :** गंगासागर नाटकातील प्रमुख कलावंत रंगभूषा व वेशभूषा करतात. त्यासाठी आधुनिक सौंदर्य प्रसाधनांचा वापर केल्या जातो. भडक असे जरीचे व मलमलीचे कपडे वापरतात. ते बाजारातून कायमस्वरूपी खरेदी करतात. काही तयार करून घेतात. केसासाठी विग, गंगावन याचा वापर होतो. डोक्यावर टोप (मुकुट) वापरतात. स्त्री–पात्रांच्या वेशभूषेसाठी वेगळे कपडे घेतल्या जात नाही. गावातील महिलांच्या नवीन साड्या, ब्लाऊज, वापरतात. कार्यक्रम संपला की परत करतात. पावडर, काजळ, लिप्स्टीक,

फुलांचे गजरे, हार इत्यादीचा वापर केल्या जातो. परंतु त्यासाठी खास असा रंगकर्मी नसतो. गावातील मुलेच एकमेकांची रंगभूषा व वेशभूषा करून देतात. शिपायाच्या वेशभूषेसाठी पोलीस किंवा सैनिक वापरतात तसा खाकी किंवा हिरव्या कापडाचा गणवेश शिवून घेतात. किंवा गावात एखाद्याजवळ असेल तर खेळापुरता मागून आणल्या जातो; व खेळ संपल्यावर परत केल्या जातो.

रंगभूषेला व वेशभूषेला फारसे महत्त्व नसले तरी ते पात्र उठावदार व्हावे याकडे कटाक्षाने लक्ष देतात. वेळेवर एखादे लहानसे पात्र असेल तर वेशभूषा न बदलवता ते निभावून नेल्या जाते. उदाहरणार्थ म्हातारीची वेगळी वेशभूषा करावी लागत नाही. एखादा पुरूष डोक्यावर लाल किंवा रंगीत कापड पदर घेतल्यासारखे ओढून रंगमंचावर येते. म्हातारीचा अभिनय करते. गावात जे मिळेल त्याचा वापर करण्यावर अधिक भर असतो.

**वाद्यवृंद :** गंगासागर या लोकनाट्यात वाद्यसंगीताला फार महत्त्व आहे. प्रयोगाच्या वेळी रंगमंचावर एका बाजूला गायन व वादन करणारी मंडळी बसतात. त्यांची संख्या निश्चित नाही. पण सात ते आठच्या वर असते. त्यात ढोलके, तुणतुणे, तबला, पेटी, झांज, खंजरी अशी वाद्ये असतात. गायन सामूहिक स्वरूपात असते. गायन करणाऱ्यांना गंगासागर नाटकातील गाणी मुखोद्‌गत असतात. गाणी बोलीभाषेत असतात. गाण्याची चाल धावती असते. कधी कधी एकच चाल दोनतीन गाण्यासाठी वापरतात. पात्राने गाणे म्हणायला सुरूवात केली की, गायन करणारी मंडळी ते गाणे उचलतात; व तालासुरात पूर्ण करतात. इकडे गायन सुरू असताना रंगमंचावर ते पात्र त्यानुसार अभिनय करते.

गायन करणारी मंडळी रात्रभर जागतात. नाटकाच्या यशस्वी प्रयोगात या मंडळीचा सिंहाचा वाटा असतो. गंगासागर नाटकात नमनापासून तर शेवटी आरतीपर्यंत ही मंडळी सर्व गाणी वाद्यासह मोठ्या आवाजात व तालासुरात म्हणतात. वेळप्रसंगी त्यातील एखादा वादक किंवा समूहगान करणारा एखादा गायक एखादी लहान भूमिका वठवण्यासाठी थोड्यावेळापुरता वेळेवर तयार होतो. आपले काम झाले की, परत वादन किंवा गायनात साथ देतो. गंगासागर मधील सर्व गाणी सामूहिकपणे म्हणतात. गायन—वादन—अभिनय यांचा सुरेख संगम मला गंगासागर या लोकनाट्याच्या प्रयोगात क्षीरसमुद्र या गावात पाहायला मिळाला.

**रंगमंच :** गंगासागर या नाटकाच्या प्रयोगासाठी रंगमंच आवश्यक असतो. त्यासाठी स्वतंत्र रंगमंचाची व्यवस्था करावी लागते. कारण याचा प्रेक्षक संख्येने अधिक असल्यामुळे सर्वांना दूरपर्यंत दिसेल अशी व्यवस्था करावी लागते. येरणगाव येथे (येरणगाव हे लेखकाचे गाव आहे. ते वर्धा शहरापासून त्रेचाळीस किलोमीटर अंतरावर असून हिंगणघाट तालुक्यात आहे) जेव्हा हा प्रयोग झाला होता. तेव्हा गावच्या प्राथमिक शाळेच्या पटांगणात मोठा रंगमंच उभारला होता, असे मला आजही आठवते. तर क्षीरसमुद्र (हे गाव वर्धा शहरापासून अंदाजे दहापंधरा किलोमीटर अंतरावर असून सेलू तालुक्यात आहे) ह्या गावला २०१२ मध्ये दसऱ्याच्या रात्री जो प्रयोग केला, त्यात मंदिराच्या सभामंडपाच्या समोरच्या उंच भागाचा उपयोग रंगमंच म्हणून केला. त्यासाठी स्वतंत्र रंगमंच उभारला नव्हता. देवळाचा पार, चौकातील एखादा मोठा उंचवटाही रंगमंच म्हणून वापरला जातो. पण ही व्यवस्था नसेल तर रंगमंच उभारावाच लागतो.

**गंगासागर लोकनाट्यातील गाणी :** गंगासागर या लोकनाट्यात पहिल्या अंकापासून तर शेवटच्या अंकापर्यंत मोठ्या संख्येने गाणी आहे. परंतु त्याचे स्वरूप संगीत नाटकासारखे नाही. गंगासागर नाटकातील गाणी ‘यक्षगान’ नाटकाप्रमाणे आहे. यक्षगान नाटकात संवाद नसतात. तर त्यात गाणी असतात. आणि पात्रे त्या गाण्याच्या अर्थाप्रमाणे अभिनय करतात. गंगासागरमध्ये मात्र गाणी आणि संवाद दोनही आहेत. रंगमंचावरील पात्रे संवाद म्हणतात; व नंतर गाणी म्हणतात. ह्या गाण्याचा आणि संवादाचा अर्थ मात्र सारखा असतो. उदा:

शंकरजी : अरे, माझ्या सिंहासनावर कोण तपस्वी राजा बसला आहे? अरे राजा माझे सिंहासन फार डोलायला लागले.

गाणे : कोण राजा तपी बसला
माझा सिंहासन डोलला
काय कमी असेन राजाला
म्हणून त्याने माझा धावा केला

गंगासागर नाटकात प्रत्येक पात्राच्या तोंडी गाणी आहेत. असे एकही पात्र नाही की, ज्याच्या तोंडी गाणी नाहीत. गाणी मौखिक असल्यामुळे त्यात गावपरत्वे

थोडासा बदल झालेला दिसतो. चाळीच किलोमीटर अंतरावर किंवा जवळच्या गावामध्येही हा बदल पाहायला मिळतो. एकाच प्रसंगातील गाणे दोन गावातील लोकांकडून ऐकले तर गाण्याच्या कडव्यात थोडासा बदल जाणवतो. जसे गुराख्याचे गाणे पाहा :

गाणे :  काळी काळी म्हैस माझी गोल सिंगाची
रोज बसते पाण्यामंधी सवय पाण्याची

भरपूरं दूध देते सवय दूधाची
रोजं बसते पाण्यामंधी सवय पाण्याची

तिला आणीनं शेवऱ्याचा चारा
दूध देईनं चारही धारा

धावू धावू गा दुखते मांड्या
नाही कलत भोंडा सांड्या

(प्रत्येक गावातील लोक आपल्या मताप्रमाणे अशा प्रकारच्या गाण्यात बदल करतात. गंगासागर या लोकनाट्याची संहिता मौखिक परंपरेने चालत आली असल्यामुळे त्यात बदल होताना दिसतो. वरील गाणे मी पुढीलप्रमाणे ऐकले होते.

माझी काळा काळी म्हैस दादा बसते ऐसपैसं
इचे कानं बघा, जसे नागोलीचे पानं
माझी काळी काळी म्हैसं दादा बसते ऐसपैसं

वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तहसील मधील 'निधा' गावातील लोकांनी गंगासागर हे नाटक बसविले होते. वरील गाणे मी त्यांच्याकडून ऐकले.)

गंगासागर मधील गाण्यातून प्रादेशिक जीवनाचे प्रतिबिंब दिसते. उदाहरणार्थ 'बांधी' आणि 'कुंधा' हे दोन शब्द शेतीशी निगडीत आहे. पावसाळ्यात शेतातून पाणी बाहेर पडण्यासाठी जो लहान बांध खोदला जातो. त्याला बांधी किंवा बांदी असे म्हणतात. त्याचप्रमाणे 'कुंधा' हा शब्द आहे. शेतात पिकामध्ये एक विशिष्ट प्रकारचे तण वाढतात, त्याला कुंधा किंवा कुंदा असे म्हणतात. शेतकरी निंदन करून त्याला काढून फेकतात.

वरील 'बांधी व कुंधा' याप्रमाणेच समाजात झालेला बदलही गंगासागर लोकनाट्यात पाहायला मिळतो. माझ्या लहानपणी आमच्या परिसरात कपासीचे एक वाण होते. त्याला 'चालुबुरी' असे म्हणत. चालु आणि बुरी ह्या दोनही कापसाच्या जाती होत्या. मला आठवते ह्या दोनही जातीच्या बिया एकत्र करून पेरल्या जात होत्या. त्याचे उत्पादन फारच कमी होत असे. या वाणाला फार महत्त्व नसे. म्हणून एखाद्या वस्तुचे महत्त्व कमी सांगण्यासाठी 'चालुबुरी' हा शब्द आजही हिंगणघाट परिसरातील लोक वापरतात. मात्र १९७० च्या जवळपास 'एच फोर' (H4) हे पऱ्हाटीचे नवीन वाण आले होते. याचाच उल्लेख या लोकनाट्यात आलेला आहे. पाहा :

बेबीनंदा चाल करू शेतीचा धंदा
आता काढ कुंदा
एच फोर पेरली यंदा
आता काढ कुंदा

वरील गाणे पाहिल्यावर त्या त्या भागातील समाजजीवनात झालेला बदल पाहायला मिळतो. त्यातूनच प्रादेशिकता समजून घेता येते. लोकगीतात बदलत्या समाजाचे प्रतिबिंब दिसते. म्हणून लोकसाहित्याला समाजजीवनाचा 'आरसा' असे म्हटल्या जाते.



# गंगासागर लोकनाट्यातील व्यक्तिचित्रे

**गंगासागर राणी :—** गंगासागर या लोकनाट्यातील महत्त्वाचे पात्र म्हणजे संतसेन राजाची लाडकी राणी गंगासागर होय. तिचे माहेरचे नाव 'पद्मा'. पद्मावती नगरीच्या दंतपाल राजाची मुलगी व धर्मपाल राजाची ती बहीण आहे. लहान मुले जसा वडिलांजवळ हट्ट करते. त्याचप्रमाणे ती दंतपाल राजाजवळ हट्ट करताना दिसते. राजा वनदेवीच्या दर्शनाला एका अरण्यात जात आहे, असे जेव्हा तिला समजले, तेव्हा ती वडिलांसोबत जाण्याचा हट्ट करते. तिच्या मताप्रमाणे राजा दंतपाल तिला वनदेवीच्या दर्शनाला घेऊन जातो.

वनदेवीच्या देवळात गेल्यानंतर तेथील वनात राजाला शिकार करण्याचा मोह होतो. आपल्या मुलीला वनदेवीच्या देवळाजवळ थांबवून राजा व शिपाई शिकारीला निघून जातात. तेव्हा तिला वाटणारी स्त्रीसुलभ भिती ती वडिलांना बोलून दाखविते. 'पाखराचा चारी नाही व माणसाचा वारा नाही' अशा या भयान वनात मी एकटी कशी काय राहणार, असे ती आपल्या वडिलांजवळ बोलून दाखविते. ठकाई मावशीसोबत बोलताना ती रागात येते. कारण ठकाई मावशी एका तरूणाबद्दल तिच्याशी बोलत असते. तेव्हा मात्र रागाने ती ठकाई मावशीच्या गालफटात हाणते. पुन्हा असा निरोप घेऊन येऊ नकोस म्हणून बजावते. तिचा नवरत्नाचा हार चोरीला जातो. तेव्हा मात्र ती कासावीस होते. आपले वडील आता रागावतील म्हणून ती ठकाई मावशीला राजाकडे पाठविते; व मुलीचा नवरत्नाचा हार चोरीला गेल्याचे तिच्याकडून सांगते.

शंकावती नगरीचा राजकुमार जेव्हा तिला भेटायला येतो, तेव्हा ती त्याचे पानसुपारी देऊन आदरातिथ्य करते. यावरून ती राजघराण्याला साजेसा व्यवहार करताना दिसते. शंकावती नगरीच्या राजकुमाराने ती झोपेत असताना तिच्या गळ्यातला नवरत्नाचा हार चोरून नेला; व तिच्या डाव्या भुजेवर त्रिशुळाची खूण केली. त्यामुळे तिला चेटकीन समजून दंतपाल राजा तिला आपल्या वाड्याबाहेर काढतो. तू पापी असून तुने माझ्या राजवंशाला डाग लावला म्हणून अपमान करतो; व शिपायाला सांगून तिला वनात नेऊन ठार मारण्याची आज्ञा देतो. शिपाई तिला वनात ठार मारण्यासाठी नेतो. परंतु त्याला तिची दया येते. शिपाई तिला वनात सोडून देतो. एका हरणीची शिकार करून रक्त तलवारीला लावतो. व रक्ताने माखलेली तलवार राजाला दाखवितो.

वनदेवीच्या देवळाजवळ पद्‍मावतीला सोडून शिपाई नगराला वापस येतो. त्याचवेळी शंकावती नगरीचा राजकुमार आपला मित्र बिरबल याच्यासोबत वनात शिकारीला येतो. तेथे राजकुमारी दरिद्री वेशात दिसते. राजकुमार तिची विचारपूस करतो. पण ती रागात येत नाही. 'तुमच्यामुळेच माझ्यावर अशी वनवासी होण्याची वेळ आलेली आहे' असे ती राजकुमाराला सांगते. राजकुमार तेथेच वनदेवीच्या साक्षीने तिच्याशी विवाह करतो. दोघेही वनदेवीला नमस्कार करतात व आशीर्वाद घेतात. वनदेवी प्रसन्न होऊन बोलते. 'मुली, तू गंगेसारखी निर्मळ आहेस; व पाण्यासारखी पातळ आहेस म्हणून तुझे नाव मी 'गंगासागर' ठेवते. व राजकुमार, तू संतासारखा सज्जन दिसतो म्हणून तुझे नाव 'संतसेन' असे ठेवते. आता पद्‍मावती नगरीची राजकन्या पद्‍मा ही गंगासागर राणी बनून शेवटपर्यंत वावरते. वनदेवीने गंगासागर नाव ठेवल्यामुळे पद्‍मा ही गंगासागर बनते.

शंकावती नगरीच्या संतसेन राजाबरोबर गंगासागर राणीचा संसार सुखी व आनंदाचा असतो. पण काही काळानंतर गंगासागर खिन्न व उदास दिसते. आपल्याला मुलबाळ नाही म्हणून ती मनात झुरत असते. सर्वसाधारण बाईप्रमाणे ती येथे वावरताना दिसते. शेवटी निपुत्रिक स्त्रियांचे दु:ख सगळीकडे सारखेच आहे. राजा तिच्या दु:खाचे कारण विचारतो. 'आपल्या लग्नाला बरीच वर्षे झाली; पण आपल्याला मुलबाळ नाही. म्हणून आपण दु:खी असल्याचे ती राजाला सांगते'.

ठरल्याप्रमाणे गंगासागरला सहा महिण्याचा गर्भ असतानाच राजा स्वर्गाला निघून जातो. तिला ही बातमी तिची मैत्रिण कमलावतीकडून मिळते. राजा स्वर्गाला गेला या गोष्टीवर तिचा विश्वास बसत नाही. म्हणून ती दिवाणाच्या वाड्यात येते. पण दिवाण तिला वाड्याबाहेर काढून देतो. कारण दिवाणाच्या हातात राज्य सोपवून राजा स्वर्गाला जातो. राज्यसत्तेच्या मोहाने दिवाण मस्तवाल होतो. आणि गंगासागर राणीवर गुराख्याचे पोट आणल्याचा आरोप करतो; व तिला वनात नेऊन शिरच्छेद करण्याची आज्ञा शिपायाला देतो. आपण कोणतेही पाप केलेले नाही, असे ती दिवाणाला सांगते, आणि अशा स्थितीत मला वनात पाठवू नको अशी ती दिवाणाला विनंती करते. पण दिवाण तिची विनंती धुडकावून लावतो. शिपाई गंगासागरला वनात तिचा शिरच्छेद करण्यासाठी घेऊन जातो. वनात गेल्यावर शिपाई तिला शेवटची इच्छा विचारतो. 'आपल्याला मारण्याअगोदर दोन घूट पाणी पाजावे', अशी ती शिपायाला सांगते. शिपायाला दया येते. तो तिला ठार न मारता वनात सोडून

देतो. मला जर सोडून दिले तर दिवाण तुला नोकरीवर ठेवणार नाही, असे ती शिपायाला सांगते. पण शिपाई तिला सोडून देतो. एका हरणीची शिकार करून रक्त तलवारीला लावतो व दिवाणाला दाखवतो.

शिपायाने गंगासागरला वनात नेऊन सोडल्यावर ती फिरत फिरत धर्मपाल राजाच्या पद्मावती नगरीत प्रवेश करते. काही कामगारासोबत (वढर) दरिद्री अवस्थेत गंगासागरही कष्ट करते. एक दिवस मजुरी मागण्यासाठी राजाकडे जाते. राजा तिची विचारपूस करतो. तेथे ती आपली खरी ओळख सांगते. घडलेली संपूर्ण घटना कथन करते. तिचे म्हणणे ऐकल्यावर 'बाई, तू माझी बहीण असून आपण अर्धे अर्धे राज्य वाटून घेऊ असे धर्मपाल राजा तिला म्हणतो. पण शेवटी गोरक्षनाथाच्या सांगण्यावरून तिचा वनात शिरच्छेद करण्याची आज्ञा शिपायाला देतो. येथेही शिपाई तिला ठार न मारता वनात सोडून देतो. त्यावेळी ती नऊ महिण्याची गरोदर असते.

वनात गंगासागरचे बाळंतपण होते. शंकराच्या कृपेने तिला व तिच्या बाळाला जीवदान मिळते. तिचा मुलगा रत्नपाल मोठा होतो; व दिवाणाचा बदला घेतो. दिवाणाला ठार करून तो मामाच्या वाड्याकडे निघतो. शेवटी मामा धर्मपाल गंगासागरला म्हणजेच आपल्या बहिणीला शरण जातो. ती त्याला क्षमा करते. एक आई व बहीण अशा दोनही पातळीवर तिचे वागणे शोभून दिसते.

या संपूर्ण कथानकात ती एक सर्वसाधारण स्त्री म्हणून आपल्याला दिसते. आर्जव, विनंती करणारी, प्रसंगी आपल्या बाळाच्या प्राणरक्षणासाठी पाया पडून विनंती करणारी गंगासागर आपल्याला दिसते. कित्येक वेळा तिच्यावर कठीण असे प्रसंग येतात; पण त्यात ती विचलित होत नाही हे खरे. पण त्यातून सुटण्यासाठी ती फारसा प्रयत्न करताना दिसत नाही. कारण ती स्त्री असल्यामुळे तिच्यावर मर्यादा येतात. शंकावती नगरीची महाराणी म्हणून वावरताना तिच्याबद्दल प्रेक्षकांच्या मनात दया निर्माण होते. तिच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू येथे आपल्याला दिसते. लहानपणी वडिलांजवळ हट्ट करणारी पद्मा, ठकाई मावशीच्या कमरेवर लाथ मारणारी; व गालावर चापटा मारणारी पद्मा ही गंगासागर बनल्यावर मात्र पूर्णपणे वेगळी दिसते. एक परिपूर्ण माता म्हणून शोभून दिसते.

**दिवाण :** गंगासागर लोकनाट्यातील हे पात्र अत्यंत महत्त्वाचे आहे. ते नाटकात शेवटपर्यंत वावरताना दिसते. दिवाण हा धूर्त, कावेबाज व लोभी असतो. शंकावती नगरीच्या राजकुमाराचा हा बालमित्र. त्याचे नाव बिरबल. सुरुवातीला आपल्या मित्राला सर्व प्रकारची मदत करणारा बिरबल हाती सत्ता येताच पूर्णपणे बदलतो.

राजकुमाराने वनदेवीच्या देवळात पाहिलेल्या मुलीचा पत्ता शोधून काढण्यासाठी बिरबल मदत करतो. पद्मावतीच्या गळ्यातील हार काढून दंडावर त्रिशुळाची खूण करायला तोच राजकुमाराला सांगतो. हार विकून अधिक पैसे मिळवायचे मनात आणून तो पद्मावती नगरीच्या शेटजीकडे जातो. शिपायाला पाहताच नवरत्नाचा हार तो शेटजीच्या हातात देतो. व ज्याच्या हातात हार असेल तो त्याचा समजावा असे शिपायाला सांगतो. येथे त्याच्या हुशारीचे व धूर्तपणाचे कौतुक वाटते. प्रत्येक प्रसंगात बिरबलाचे (दिवाण) धूर्तपण; व त्याचा शहाणपणा दिसून येतो. राजकुमारचा विवाह पद्मावतीसोबत झाला असताना त्याला मोठा आनंद होतो. आता आपला मित्र शंकावती नगरीचा राजा झालेला आहे; व आपण त्याचा दिवाण झालो आहोत म्हणून आनंद व्यक्त करणारा, आपला मित्र राजा संतसेन स्वर्गाला जाताच पूर्णपणे बदलतो. सुरवातीला तो जरी मित्रावर प्रेम करणारा, निस्पृह, निस्वार्थी वाटत असला तरी नंतर मात्र तो स्वार्थी बनतो.

ठरल्याप्रमाणे गंगासागर राणीला सहा महिण्याचा गर्भ राहताच राजा संतसेन स्वर्गाला निघून जातो. जातेवेळी तो आपले राज्य काही दिवस सांभाळण्यासाठी बिरबलला सांगतो. पण बिरबल नाही म्हणतो. पण राजाने तसे सांगितल्यावर तो लिहून मागतो; व राजाला त्यावर सही करायला सांगतो. राजाने सही केल्यावर राजा निघून जातो. हाती राज्य येताच दिवाण पूर्णपणे बदलतो. आता तो मोठ्या आनंदाने आपल्या पत्नीला ही बातमी सांगतो. मी आजपासून शंकावती नगरीचा मालक झालो आहोत असे कमलावतीला सांगतो. कमलावती आपल्या पतीला (दिवाणाला) समजावण्याचा प्रयत्न करते. हे राज्य गंगाराणीचे असून आपण तिच्या उष्ट्या अन्नावर जगत आहो. असे म्हटल्यावर दिवाणाला तिचा राग येतो. तो तिचा अपमान करतो.

राजा स्वर्गाला गेल्याची बातमी कमलावतीकडून गंगासागरला मिळते. सत्य जाणून घेण्यासाठी गंगासागर दिवाणाच्या वाड्यात येते. बिरबल तिचा अपमान करतो; व तिला वाड्याबाहेर काढतो. येथे एका स्वार्थी, धूर्त व क्रूर माणसाचे चित्र दिसते. एवढेच नाही तर तो शिपायाकरवी तिला वनात नेऊन

शिरच्छेद करण्याची आज्ञा देतो. येथे त्याचे वर्तन आयत्या बिळात नागोबा असे आहे. पण राजा बनायचे असेल तर काही अडथळा नको म्हणून गरोदर असलेल्या गंगाराणीला संपविण्याचा तो डाव रचतो. येथे त्याचा धूर्तपणा व हुशारी दिसून येते. शिपाई मात्र गंगाराणीला वनात ठार न मारता सोडून देतो.

शिपायाने गंगासागरला ठार केल्याचे सांगताच दिवाणाला आनंद होतो. त्याच्या बदल्यात तो शिपायाला दहा एकर जमीन बक्षीस देतो. एके दिवशी दिवाणाला स्वप्न पडते. शिपायाने गंगासागरला ठार न करता सोडून दिल्याचे तो स्वप्नात पाहातो. शिपायाला त्याबद्दल खरेखोटे विचारतो. गंगाराणीला जिवंत ठेवणे हे पुढे धोकादायक ठरू शकते. म्हणून तिचा शोध घेण्यासाठी शिपायाबरोबर गोरक्षनाथाच्या वेषात बाहेर निघतो. येथे दिवाणाची काम करण्याची तत्परता दिसते. कोणतेही काम लवकर तडीस नेण्याचे त्याचे कार्य कौतुकास्पद आहे.

गोक्षनाथांच्या वेशात अनेक ठिकाणी फिरून दिवाण व शिपाई गंगासागरचा शोध घेतात. परंतु त्यांना कोठेच गंगासागर दिसत नाही. शेवटी पद्मावती नगरीत त्यांचे आगमन होते. पद्मावती नगरीचा राजा धर्मपाल या दोन गोरक्षनाथांचे स्वागत करतो. त्यांना भोजनदान करतो; व एखादा पोवाडा गायला सांगतो. भोजन करत असताना दिवाण व शिपाई गंगासागरला ओळखतात. आणि पोवाडा गाऊन धर्मपाल राजासमोर गंगासागरबद्दल काही खोटेनाटे सांगतात. आमचा राजा संतसेन स्वर्गाला गेल्यावर त्याच्या राणीने गुराख्याचे पोट आणले आहे. त्या राणीला वाड्यात ठेवू नये. म्हणून दिवाण तिला वाड्याबाहेर हाकलून देण्याचे राजाला सांगते. गोरक्षनाथाचे (शिपाई व बिरबल) बोलणे खरे समजून राजा धर्मपाल गंगासागरचा अपमान करतो; व तिला वाड्याबाहेर काढून देतो. येथे दिवाणाचा धूर्तपणा दिसून येतो. आपल्या राज्याला कोणी शत्रू शिल्लक राहू नये हा त्यामागचा त्याचा उद्देश असतो.

गंगासागर राणीचे वनात बाळंतपण होते. तेथे तिला मुलगा होतो. काही दिवसांनी शिपाई व दिवाण शिकारीसाठी वनात येतात. बिरबल शिपायाला दोघांचेही शिर उडवायला सांगतो. पण शिपाई मात्र हे काम करण्यास नकार देतो. मग बिरबल स्वत: गंगासागर व तिच्या बाळाची हत्या करतो. शिपाई रागाने दिवाणाची नोकरी सोडतो. त्याचा गणवेश व टोप फेकून देतो. येथे दिवाणाच्या क्रूरतेची चरम सिमा दिसते. त्याला राज्य करताना कोणताही अडसर नको असतो. म्हणून तो स्वत:च दोघांची हत्या करतो. त्याचवेळी शंकर व पार्वती मृत्युलोकात प्रवेश करतात. पार्वतीच्या सांगण्यावरून शंकरजी

गंगासागर व तिच्या बाळाला जिवंत करतात. बाळाला जवळ घेऊन शंकरजी त्याला बळ व शक्ती प्रदान करतात. या बाळाचे नाव 'रत्नपाल' ठेव असे गंगासागरला सांगून शंकर व पार्वती निघून जातात.

रत्नपाल बारा वर्षाचा असताना वनात शिकारीसाठी जातो. तेथे दिवाणासोबत त्याची गाठ पडते. दिवाण त्याला नाव व कूळ विचारतो, निपाट्या म्हणून हिणवतो. रत्नपाल आईला ही सगळी हकीकत सांगतो. तोच तो दुष्ट दिवाण होय असे गंगासागर रत्नपालाला सांगते; व याच्यामुळेच आपल्यावर ही वेळ आलेली आहे असे सांगते. रत्नपाल लगेच दिवाणासोबत लढाई करतो व  त्याला ठार करतो. येथे नमूद करावेसे वाटते की, दिवाण हा लडाईला निर्भयपणे सामोरा जातो. मृत्यू पत्करतो पण विनंती, आर्जव, विनवणी करीत नाही. येथे त्याच्या निर्भयतेलाही दाद द्यावी लागते. एकंदरच गंगासागर नाट्यात बिरबल हे पात्र खलनायक म्हणून शोभते. मित्राचे गुण असलेला, हुशार, धूर्त, निर्भय असे हे पात्र सबंध नाटकभर वावरते.

**संतसेन** :— गंगासागर नाटकातील राजा संतसेन हे पात्र फारसे कर्तृत्ववान वाटत नाही. त्याला कारण म्हणजे हे पात्र पहिल्या अंकापर्यंतच असते. राजा संतसेन याला लगेच स्वर्गाला जावे लागते. नाटक अर्ध्या भागापेक्षा कमी असताना ते अचानक निघून जातात.

गंगासागर नाटकात सर्वात पहिले रंगभूमीवर येणारे हे पात्र आहे. शंकावती नगरीचा राजकुमार आपल्या बालपणीच्या मित्राबरोबर (बिरबल) वनात शिकारीला निघून जातो. शिकार करत असताना त्याला तहान लागते. आपल्या मित्राला तेथेच थांबवून तो पाणी पिण्यास जातो. त्याला जवळच एक वनदेवीचे देऊळ दिसते. तो त्या देवळात एक सुंदर मुलगी पाहतो. तिला पाहताच त्याच्या मनात तिच्याबद्दल प्रेम निर्माण होते.

आपला मित्र बिरबलला येऊन भेटल्यावर राजकुमार त्या मुलीबद्दल त्याला सांगतो; आणि मला तिच्याबरोबर विवाह करायचा आहे असे आपल्या मित्राला बोलून दाखवितो. मित्र बिरबलसुद्धा त्याच्या या कामात मदत करतो. आपल्या मित्राच्या सांगण्यावरून राजकुमार पद्मावतीच्या डाव्या भुजेवर त्रिशुळाची खूण करतो. तिच्या गळ्यातला नवरत्नाचा हार काढतो.

राजा दंतपाल आपल्या मुलीला चेटकीन समजून शिपायाच्या स्वाधीन करतो; व वनात नेऊन हिचा शिरच्छेद करण्याची आज्ञा आपल्या शिपायाला देतो. वनात गेल्यावर शिपायाला तिची दया येते. त्यामुळे तो तिला वनात

जिवंत सोडून आपल्या नगराला परत येतो. ती वनदेवीच्या देवळापाशी आपले जीवन घालवत असते. पुढे एक दिवस अचानक राजकुमार वनात शिकारीला जातो. वनदेवीच्या देवळापासी त्याला एक मुलगी दिसते. तिची तो विचारपूस करतो. 'तुमच्यामुळेच माझ्यावर वनवासी होण्याची वेळ आली आहे', असे पद्मावतीने सांगताच राजकुमार तिच्यासोबत विवाह करतो. त्याचे तिच्यावरचे प्रेम कमी झालेले नसते. वनदेवीच्या देवळात विवाह झाल्यावर दोघेही वनदेवीचा आशीर्वाद घेतात. वनदेवी प्रसन्न होते. देवी म्हणते, 'राजकुमार, तू संतासारखा सज्जन दिसतो म्हणून तुझे नाव मी संतसेन असे ठेवते. व मुली तू गंगेसारखी निर्मळ आहे; व पाण्यासारखी पातळ आहे म्हणून तुझे नाव मी गंगासागर ठेवते. आणि तू तुझ्या मित्राला दिवाण म्हणून ठेव असे म्हणून वनदेवी अदृश्य होते'.

गंगासागर राणीबरोबर राजा संतसेन सुखात व आनंदात राज्य करीत असतो. पण पत्नी गंगासागर शोकमग्न दिसते. म्हणून तो आपल्या प्रिय पत्नीला विचारतो, 'तु दु:खी का दिसतेस'? आपल्याला मुलबाळ नाही म्हणून दु:खी असल्याचे गंगासागर राजाला सांगते. राजा त्वरित ज्योतिष्याला बोलावतो. ज्योतिष्याकडून माहिती मिळवून राजा संतसेन शंकराचे तप करायला वनात निघून जातो. भगवान शंकर प्रसन्न होतात. राजाला वर मागतात. आपल्या घरी धनधान्याला काहीच कमी नाही; पण पोटी संतान नाही, म्हणून देवा तुझ्याकडे आलो आहो. भगवान शंकर म्हणतात, 'राजा, तुझ्या पोटी पुत्र आहे; पण तुला काळ कठीण आहे. कोणत्याही कठीण परिस्थितीला तोंड देण्याची आपली तयारी असल्याचे राजा संतसेन भगवान शंकराला सांगतो. तसे तो वचन शंकराला देतो. राणीला सहा महिण्याचा गर्भ राहताच तुला स्वर्गाला यावे लागेल, असे शंकराने सांगताच राजा तयार होतो. शंकरजी राजाला पुत्र होण्याचा वर देतात. राजा तप पूर्ण करून आपल्या नगराला परत येतो. गंगासागरला दिवस जाते. ती सहा महिण्याची गरोदर असताना राजा आपला मित्र दिवाण याला राज्य सोपवून प्रजेची काळजी घ्यायला सांगतो; व शंकराला दिलेल्या वचनाप्रमाणे स्वर्गाला निघून जातो.

संपूर्ण भागात राजा संतसेन हा दयाळू, मित्रावर विश्वास ठेवणारा, पत्नीची व प्रजेची काळजी घेणारा, वचनाला जागणारा असा आहे. त्याच्या कृतीमधून हे गुण दिसतात. पण पात्राला उठाव येण्यासारखे असे कोणतेही कर्तृत्ववान प्रसंग दिसत नाही. त्याला कारण हे पात्र फार कमी वेळ नाटकात आहे.

**कमलावती :—** थोड्या वेळापुरते का होईना एक पात्र सर्वांचे लक्ष वेधून घेते. ते पात्र म्हणजे कमलावतीचे होय. कमलावती ही बिरबलची (दिवाण) पत्नी आहे. तिचा रंगमंचावर प्रवेश तसा उशिरा होतो. राजा संतसेन दिवाणाच्या हातात राज्यकारभार सोपवून स्वर्गाला निघून जातो. आपण आता या राज्याचा धनी झालो आहो असे समजून ही आनंदाची बातमी तो आपल्या पत्नीला सांगतो. कमलावती ही प्रामाणिक, खाल्ल्या अन्नाला जागणारी, शहाणी व सुशील स्त्री म्हणून नाटकात वावरते. राज्यसत्तेच्या धुंदीने मदमस्त झालेल्या आपल्या पतीला ती प्रेमाणे शहाणपणाचा सल्ला देते. 'हे राज्य आपले नसून ते गंगासागर राणीचे आहे'. ही जाणीवही ती आपल्या पतीला करून देते. प्रसंगी दिवाणाकडून तिचा अपमानही होतो. 'आपण गंगाराणीच्या उष्ट्या अन्नाचे मालक आहोत' या एकाच वाक्यावरून तिचा शहाणपणा दिसतो. राजा स्वर्गाला गेल्याची बातमी कमलावती आपली प्रिय सखी गंगासागर राणीला सांगते. दोघीही शोक करतात. कमलावतीचे पात्र फारसे उडावदार नसले तरी गंगासागर राणीची सखी; व दिवाणाची पत्नी म्हणून ती थोड्या वेळासाठी रंगभूमीवर वावरते.

**शिपाई :—** शिपाई हे पात्र सबंध नाटकभर वावरताना दिसते. एकाच वेळी तो शंकावती नगरीच्या राजाचा शिपाई व पद्मावती नगरीच्या राजाचा शिपाई म्हणून रंगमंचावर वावरताना दिसतो. 'शिपाई अलिकडे' असे म्हणताच वाद्याच्या तालावर नाचत नाचत त्याचा रंगभूमीवर प्रवेश होतो. डोक्यात खाकी टोपी, खाकी हाप पँट किंवा फूल पँट, खाकी शर्ट, हातात तलवार, कमरेला पट्टा असा पोषाख केलेला शिपाई सर्व प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतो. शिपाई हे पात्र विनोद निर्मितीही करते. त्याचे तोंडी असलेले संवाद बरेचशे गद्यपद्यमिश्रित आहे. तो वागण्यातून तसेच बोलण्यातून विनोद निर्माण करतो.

शंकावती नगरीचा दिवाण त्याला एक फार मोठी कामगिरी सोपवतो. ती कामगिरी म्हणजे गंगासागर राणीला वनात नेऊन ठार करण्याची. दिवाणाच्या आज्ञेप्रमाणे तो गंगासागरला ठार मारण्यासाठी वनात नेतो. पण तो मनाने दयाळू असल्यामुळे तिला ठार न मारता सोडून देतो. वाटेत एका हरिणीची शिकार करून रक्त तलवारीला लावतो व दिवाणाला दाखवतो. दिवाण शिपायावर खुश होतो. दिवाण शिपायाला म्हणतो की, 'तुला काय मागायचे असेल ते माग'. त्यावर शिपाई दिवाणाला दहा एकर जमीन मागतो.

एवढी जमीन तुला कशाला पाहिजे, असे दिवाणाने विचारताच 'पाच एकर घर बांधायला; व पाच एकर परसाकडे जायला' हे त्याचे उत्तर असते. त्याचे बोलणे एवढे प्रसंगाला धरून असते की, प्रेक्षक पोट धरून हसतो. विनोद निर्माण करणे हा त्याच्या हातचा मळ असतो.

दिवाण व शिपाई वनात शिकारीसाठी जातात. तेथे त्यांना गंगासागर व तिचा बाळ दिसतो. गंगासागर व तिच्या बाळाचे शिर उडविण्याची आज्ञा दिवाण शिपायाला देतो. 'या दोघांना ठार मारल्यावर या पापाचे वाटेकरी कोण होणार असा प्रतिप्रश्न तो दिवाणाला विचारतो; आणि तलवार म्यान करतो. शेवटी दिवाण स्वत: गंगासागर व तिच्या मुलाला ठार मारतो. याचा शिपायाला मोठा राग येतो. तो दिवाणाची नोकरी सोडून देतो. त्याचा टोप, तलवार फेकून देतो आणि रागाने निघून जातो. येथे त्याच्या जवळ असलेल्या माणुसकीचे दर्शन होते.

शंकावती नगरीचा शिपाई; व पद्मावती नगरीचा शिपाई वेगवेगळा असला तरी रंगमंचावर मात्र एकच शिपाई दोन्हीकडे काम करताना दिसतो.

**दंतपाल :** पद्मावती नगरीचा राजा दंतपाल नाटकाच्या अगदी सुरूवातीला आपल्याला भेटतो. वनदेवीच्या दर्शनासाठी तो वनात जाताना सोबत आपल्या मुलीला पद्माला घेतो. राजकुमारीचा नवरत्नाचा हार चोरीला गेल्याचे समजताच शिपायाला दवंडी द्यायला सांगतो. शिपाई हार परत आणतो. शंकावती नगरीचा राजकुमार स्मशानात शंकराचे तप करीत बसलेला असताना त्याला तो हार एका भुताने दिला; व आपण त्या भुताच्या डाव्या भुजेवर त्रिशुळाने खूण केली असे राजाला शिपायाकडून समजते. नगरातल्या सगळ्या लोकांच्या भुजेवर त्रिशूळाची खूण आहे का ते पाहून ये, अशी आज्ञा राजा लगेच आपल्या शिपायाला देतो. कोणाच्याही भुजेवर तशी खूण आढळली नाही असे शिपायाने सांगताच राजवाड्यातील लोकांच्याही भुजा पाहाण्यास सांगतो. येथे सर्वांसाठी सारखी वागणूक राजा दंतपाल देतो. राजकुमारी पद्माच्या डाव्या भुजेवर तशी खूण दिसताच तिला चेटकीण समजून वाड्याबाहेर काढून देतो. एक कर्तव्यकठोर राजा असे त्याचे एकंदरीत चित्र दिसते. दंतपालाची भूमिका ही लहान असल्यामुळे त्याच्या पात्राला फारसा उठाव नाही. मात्र हे पात्र फार थोडा वेळ रंगभूमीवर असूनही प्रेक्षकांच्या स्मरणात राहाते.

**गुराखी, वढर, शेटजी व ठकाई मावशी :** शंकावती नगरीचा गुराखी, पद्मावती नगरीचे वढर, शेटजी व ठकाई मावशी ही पात्रे विनोद निर्मिती करतात. सुरुवातीला ठकाई मावशीच्या झोपडीत राजकुमार व बिरबल जातो. त्यांच्याशी झालेला तिचा संवाद प्रेक्षकांना हसायला भाग पाडतो. मावशीचा विनोद हा शब्दनिष्ठ विनोद आहे. तिची भाषा अस्सल ग्रामीण बोली आहे. हे पात्र फारच थोड्या वेळासाठी रंगमंचावर येते. वेळेवर कोणताही हजरजबाबी मनुष्य हे पात्र रंगवतो. मावशी या पात्रासाठी वेगळी वेशभूषा व रंगभूषा केली जात नाही. एखादे रंगीत कापड किंवा उपरणे डोक्यावर पदरासारखे घेऊन; व म्हाताऱ्या बाईसारखा आवाज काढून हे पात्र रंगमंचावर वावरते.

गुराखी, वढर व शेटजी यांचा विनोद हा शब्दनिष्ठ विनोद आहे. त्यातून प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन होते. ही पात्रे थोड्या वेळाकरिता येतात. यांची वेगळी अशी रंगभूषा किंवा वेशभूषा नसते. हातात गुरे राखायची लांब काठी घेऊन व डोक्याला फेटा गुंडाळून गुराख्याचे पात्र वावरते. तर एक पोट फुगलेला ढेबरा मनुष्य थोड्या वेळासाठी शेटजी बनतो. वढर (गोट्यामातीचे काम करणारे मजूर) व दिवाण यांचे संवादही विनोद निर्माण करतात.



# पात्र परिचय

| | | |
|---|---|---|
| संतसेन | : | शंकावती नगरीचा राजा |
| गंगासागर | : | संतसेन राजाची राणी |
| पद्मा | : | पद्मावती नगरीची राजकन्या |
| बिरबल | : | संतसेन राजाचा मित्र (दिवाण) |
| कमलावती | : | बिरबलची पत्नी |
| दंतपाल | : | पद्मावती राज्याचा राजा |
| धर्मपाल | : | दंतपाल राजाचा पुत्र |
| रत्नपाल | : | संतसेन राजाचा पुत्र |
| शेटजी | : | पद्मावती नगरीचा |
| शिपाई | : | शंकावती व पद्मावती नगरीचा |
| वढर | : | काम करणारे मजूर |
| चंद्रसेना | : | धर्मपाल राजाची कन्या |
| ज्योतिषी | : | शंकावती नगरीचा |
| इतर पात्रे | : | मावशी, गुराखी, शंकर, पार्वती, वनदेवी |

# अंक पहिला

**(रंगमंचावर सगळे कलावंत वेशभूषा करून येतात. हातात पेटलेली उदबत्ती किंवा आरती घेऊन; आणि प्रेक्षकांकडे तोंड करून पुढील नमनगीत म्हणतात.)**

**नमन** : नमो त्रिभुवना सारी देवांगना
गणपतीला प्रार्थना ।। धृ ।।

पहिले नमन गणपतीला
गणपतीच्या सरस्वतीला
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। १ ।।

दुसरे नमन गुरुदेवाला
गुरुदेवाच्या कामकऱ्याला
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। २ ।।

तिसरे नमन शंकराला
शंकराच्या पाराबतीला
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। ३ ।।

चौथे नमन रामरायाला
रामरायाच्या सितामातेला
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। ४ ।।

पाचवे नमन पाची पांडवाला
पांडवाच्या द्रौपदीला
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। ५ ।।

आमचा भोळा शंकरं
राहातो गडावरं
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। ६ ।।

तू का जनतेचा दाता
आमची पार्वती माता
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। ७ ।।

आमची होईलं चुकं
तुम्ही करावे माफं
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। ८ ।।

आम्ही करतो गायनं
ऐका कानं देऊनं
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला पांर्थना ।। ९ ।।

गंगासागरची कथा
ऐका लक्ष देऊनं
साह्य व्हावे आम्हाला
आम्हा बालकाला, गणपतीला प्रार्थना ।। १० ।।

नमो त्रिभुवना, सारे देवांगना
गणपतीला प्रार्थना ।।

**(शंकावती नगरीचा राजकुमार प्रवेश करतो. म्हणतो –)**

राजकुमार : चला, आज आपण कुठे तरी शिकार करण्यास गेलो पाहिजे; पण माझा मित्र बिरबल अजून आलेला नाही.

**(इतक्यात बिरबल येतो)**

राजकुमार : अरे मित्रा, आज आपण कुठेतरी शिकार करण्याकरिता गेलो पाहिजे.

बिरबल : होय राजकुमार. चला आता, आपण शिकार करण्यासाठी गेलो पाहिजे.

**(राजकुमार व बिरबल यांचा वनात प्रवेश)**

राजकुमार : मित्रा, आता आपण या वनामध्ये शिकार केली पाहिजे.

बिरबल : होय मित्रा. आता आपण याच वनामध्ये शिकार केली पाहिजे.

राजकुमार : मित्रा, तू इथेच थांब. मी लवकरात लवकर पाणी पिऊन येतो.

बिरबल : मी इथेच थांबतो मित्रा. तू लवकरात लवकर पाणी पिऊन ये.

राजकुमार : होय मित्रा.

**(रंगमंचावर पद्मावती नगरीचा राजा दंतपाल प्रवेश करतो)**

दंतपाल : आज आपण वनदेवीच्या दर्शनाला गेलो पाहिजे. तर आपला शिपाई आपल्यासोबत घेतला पाहिजे.

दंतपाल : शिपाई अलीकडे.

शिपाई : आज्ञा महाराज. कशासाठी बोलावले ते मला लवकरात लवकर सांगा.

दंतपाल : अरे शिपाई, आज आपण वनदेवीच्या दर्शनाला गेलो पाहिजे.

शिपाई : होय महाराज.

पद्मा : पिताजी, आज तुम्ही कुठे जाणार ते मला लवकर सांगा.

दंतपाल : मुली, आज मी वनदेवीचे दर्शन घेण्याकरिता जात आहो.

पद्‌मा : बाबा, तर मी तुमच्यासोबत वनदेवीचे दर्शन घेण्यास येते.

दंतपाल : मुली, तू येऊ नको.

पद्‌मा : गाणे ...

बाबा येते मी, येते मी, तुमच्या संगतीला
वनदेवीचे, देवीचे दर्शन घेण्याला
वनदेवीची देवीची आरती गाईनं
आम्हा सर्वांना सर्वांना पावन होईनं.

पद्‌मा : बाबा, तुम्ही नाही म्हणू नका. मी आल्याशिवाय राहणार नाही.

दंतपाल : मुली, तुझा हट्टच आहे तर चाल.

**(राजा दंतपाल, राजकुमारी पद्‌मा व शिपाई यांचा वनात प्रवेश)**

दंतपाल : शिपाई, वनदेवीचे देऊळ आलेले आहे. तर आपण आता दर्शन घेतले पाहिजे. मुली, तू सुद्धा दर्शन घे. आणि शिपाई, तू सुद्धा दर्शन घे.

दंतपाल : अरे शिपाई, आता इथे वन दिसते. या वनामध्ये आपण शिकार केली पाहिजे.

शिपाई : होय महाराज. आपण याच वनामध्ये शिकार केली पाहिजे.

दंतपाल : मुली, आम्ही आता लवकरात लवकर शिकार करून येतो. तरी तू इथेच थांब.

पद्‌मा : बाबा, इथे पक्षाचा वारा नाही, माणसाचा थारा नाही. आणि इथे मी कशी काय राहणार आहे.

दंतपाल : मुली, तुला कशाचीही भिती नाही. तुला वनदेवी साह्य आहे. तू कशाची काळजी करू नको.

**(दंतपाल व शिपाई निघून जातो. वनदेवीजवळ राजकुमार येतो)**

पद्‌मा : परमेश्वरा, माझे वडील अजून सुद्धा आले नाही. मला

फार भिती वाटत आहे.

**(दंतपाल व शिपाई वापस येतात)**

दंतपाल : मुली, तुला इथे कशाची भिती वाटत होती? मी तुला अगोदर सांगितले होते की, तुला वनदेवी साह्य आहे.

राजकुमार : अरे मित्रा. मी पाणी पिण्यास गेलो असताना वनदेवीच्या देवळात मला एक सुंदर मुलगी दिसली मित्रा.

बिरबल : त्या मुलीचे आपल्याला काय करायचे आहे राजकुमार. चला आपण नगराला वापस गेलो पाहिजे.

राजकुमार : त्या मुलीशी मला विवाह करायचा आहे मित्रा.

बिरबल : अरे मित्रा, त्या मुलीने तुला काही खूण केली आहे का ?

राजकुमार : होय, त्या मुलीने मला खूण केली आहे मित्रा.

बिरबल : ती खूण कशी काय केली आहे, ते मला लवकर सांग.

राजकुमार : मित्रा, मी तुला लवकरात लवकर सांगतो.

बिरबल : सांग मित्रा.

राजकुमार : अरे मित्रा, तिने डोक्याचे फूल कानाला लावले; आणि कानाचे फूल दाताला लावले, व दाताचे फूल पायावर टाकले.

बिरबल : म्हणजे आपले काम फत्य झाले.

बिरबल : अरे मित्रा. मग तिने तुला काय सांगितले, ते तुला कळले काय?

राजकुमार : मला काहीच कळले नाही.

बिरबल : अरे मित्रा, म्हणजे तिने तुला असे सांगितले की, डोक्याचे फूल कानाला लावले म्हणजे तिने तिच्या नगरीचे नाव सांगितले. तिच्या नगरीचे नाव करनाटक असावे. व कानाचे फूल दाताला लावले म्हणजे तिच्या वडिलाचे नाव 'दंतपाल'

असले पाहिजे. व तिने दाताचे फूल पायावर टाकले म्हणजे तिचे नाव ‘पद्मावती’ असले पाहिजे.

राजकुमार : तर मग चला. आता आपण त्या नगरीचा शोध केला पाहिजे.

बिरबल : होय मित्रा. चला आता, लवकर गेलो पाहिजे.

**(राजकुमार व बिरबल पद्मावती नगरीला येतात)**

बिरबल : मित्रा, इथं एक झोपडी आहे. या झोपडीत कोणीतरी म्हातारी राहात असेल.

राजकुमार : होय मित्रा. आपण त्या म्हातारीच्या साह्याने पद्मावतीच्या राजवाड्याचा शोध केला पाहिजे.

राजकुमार : मित्रा, आता तू या म्हातारीला मावशी म्हणून आवाज दे.

बिरबल : नाही मित्रा. तूच आवाज दे.

राजकुमार : मावशी, अगं ये मावशी.

मावशी : अरे बाबा. तुम्ही कोण?

बिरबल : आम्ही राजपुत्र आहो मावशी.

मावशी : रानकुत्रे इथं कायले आले बाप्पा. हाडं लेका, हाडं लेका.

बिरबल : मावशी आम्ही रानकुत्रे नाही. मावशी आम्ही राजपुत्र आहो.

मावशी : तुम्ही जेवान जेवान पोरं बाप्पा. इथं कायले आले बाप्पा.

बिरबल : मावशी, तुझ्या झोपडीत थोडीसी राहाण्यासाठी जागा दे मावशी.

मावशी : मलेस रायण्यासाठी जागा नाही बाप्पा, तर तुमाला कोटची जागा देऊ.

बिरबल : अगं ये मावशी. आम्ही तुला पैसे देऊ.

मावशी : बरं, चला बापा. काही भानगडगी करू नका बापा.

बिरबल : नाही मावशी. आम्ही भानगडगी नाही करत मावशी.

बिरबल : मावशी, तुला एक गोष्ट विचारू.

मावशी : कोणती बाप्पा. सांगाना लवकर. मले भांडे धुवाले जायचे आहे.

राजकुमार : मावशी, जी पद्‌मावती आहे ना. तिला जाऊन सांग की, वनदेवीच्या देवळात जो मित्र भेटला होता, तो तुला बोलावित आहे.

मावशी : हो बाप्पा, मले तिथेच जायचे आहे.

राजकुमार : तर मग लवकर जा.

मावशी : मी लवकर जाते. (मावशी पद्‌मावतीला हाक मारते) पद्‌मावती, अगं ये पद्‌मावती.

पद्‌मा : कोण? ठकाई मावशी आहे का?

मावशी : होय पद्‌मा. मी ठकाई मावशी हाये.

पद्‌मा : मावशी, पुष्कळ दिवसांनी घरी आलीस. काय काम होते? ते मला लवकर सांग.

मावशी : बुढा मेला तवापासून यायले भेटलं नाही. आता तरी जावं म्हणलं पद्‌मावतीची भेट घ्यायला.

पद्‌मा : नाही मावशी. तुला कोणते तरी काम आहे. खरोखर सांग.

मावशी : पद्‌मा, मी तुला खरोखरच सांगते. पद्‌मा, जो मित्र तुला वनदेवीच्या देवळात भेटला होता. तो तुझी पाखरावाणी वाट पाहात आहे.

**(पद्‌मावती रागाने म्हणते)**

पद्‌मा : मावशी, आज मला अशा गोष्टी सांगितल्या. परंतु उद्या जर सांगशील, तर आज तुझ्या गालावर थापडा मारल्या. उद्या मात्र तुझी कंबर मोडून ठेवीन.

**(मावशी रडते व त्यांना शिव्या देते)**

राजकुमार : मित्रा आपल्या झोपडीसमोर कोण्यातरी ठकाई मावशीचा आवाज येऊन राहिला आहे. तर आपण त्या म्हातारीचा शोध केला पाहिजे. तर चल.

बिरबल : मावशी, काय झालं ?

मावशी : का पुसता बाप्पा. नाही जात मनलं तर तुमी जाच मने. लेकव्हा, तुमी मले तिथं पाठवीलं. त्या पद्माराणीने माझ्या गालावर तीन थापडा मारल्या.

बिरबल : मित्रा. आपली गोष्ट फत्य झाली.

राजकुमार : मित्रा, ही गोष्ट कशी काय फत्य झाली ते मला लवकर सांग.

बिरबल : होय मित्रा. मित्रा ती गोष्ट म्हणजे अशी की, तिने मावशीच्या गालावर तीनच थापडा मारल्या. म्हणजेच ती तीन दिवसाच्या सोवळ्यावर असली पाहिजे. म्हणून तिने तीनच थापडा मारल्या.

मावशी : गाणे ...

ऐका नाथा मी सांगतो तुला
नका धाडुजी राजवाड्याला, माझे दादा
त्या रांडेने मार मारूनं
माझे गालचं केले लालं, माझे दादा

**(बिरबल पाया पडतो)**

बिरबल : मावशी, तू कशाचीही काळजी करू नको. मी तुझ्यासाठी पुरणाच्या पोईचा स्वयंपाक केलेला आहे. तरी तू जेवण कर.

मावशी : आता का मला जेवू घालता. तर द्या बाप्पा.

बिरबल : मावशीबाई, आता तू पुन्हा जाऊन सांग की, ते आलेले आहे तर तुला थोड्या वेळाने भेटण्यास सांगितले आहे म्हणा. मावशी आता तुला ती काहीच म्हणणार नाही.

मावशी : असं होय!

पद्मावती, अगं ये पद्मावती.

पद्मा : ठकाई मावशी आहे का?

मावशी : होय पद्मा.

पद्मा : ठकाई मावशी, मी तुला पहिलेच सांगितले होते की, पुन्हा माझ्या राजवाड्याला येऊ नको म्हणून. मी तुला पहिलेच सांगितले होते की, कमरेवर लात मारीन.

**(पद्मा मावशीच्या कमरेवर लाथ मारते. मावशी रडत बसते राजकुमार आणि बिरबल मावशीला उचलते)**

बिरबल : का झालं मावशी?

मावशी : पद्मावतीने माझ्या कमरेवर लात मारली बाप्पा.

राजकुमार : बरं मावशी. आता जाऊ नको. आता मी स्वतःच जाऊन येतो.

बिरबल : राजकुमार, आता तू तिच्या राजवाड्याला जाऊन ये.

राजकुमार : होय मित्रा. आता मी लवकर जातो.

बिरबल : जा मित्रा.

**(राजकुमार वाड्यात जाऊन आवाज देतो)**

राजकुमार : पद्मावती, अगं ये पद्मावती.

पद्मा : कोण आहे माझ्या राजवाड्यासमोर.

राजकुमार : मी राजपुत्र आहो पद्मा.

पद्मा : ज्या ठकाई मावशीला पाठविले ते तुम्हीच का?

राजकुमार : होय पद्मा, तोच मी राजपुत्र.

पद्मा : या राजकुमार आत. घ्या पानसुपारी.

राजकुमार : होय पद्मा.

पद्मा : बरं, तुम्ही त्या ठकाई मावशीला त्रास देण्यापेक्षा तुम्ही स्वतःच का नाही आले.

राजकुमार : बरं, आता मी आलो.

पद्मा : राजकुमार, आता मला बोलण्यास वेळ नाही. तरी उद्या नऊ वाजेपर्यंत यावे राजकुमार.

बिरबल : मित्रा, तू पद्मावतीच्या वाड्याला गेला असता तिने तुला काय सांगितले?

राजकुमार : मित्रा, मला उद्या नऊ वाजता पुन्हा बोलावले आहे.

बिरबल : मित्रा, तुला बोलावले आहे तर तू आता त्रिशूल घेऊन जा. आणि तिच्या गळ्यातला नवरत्नाचा हार काढून तिच्या डाव्या हाताच्या दंडावर त्रिशूलाची खूण करून घे, आणि आपल्या नगराला वापस ये.

राजकुमार : पद्मा, अगं ये पद्मा.

पद्मा : कोण आहे?

राजकुमार : मीच तो, काल आलो होतो. तोच राजकुमार आहो.

पद्मा : या राजकुमार, आत बसा राजकुमार. मला रात्रीचे जागरण असल्यामुळे मी थोडा वेळ आराम करते.

राजकुमार : आपल्या मित्राने सांगितलेली कामगिरी पूर्ण केली पाहिजे. आणि आपण तिच्या गळ्यातला नवरत्नाचा हार काढून तिच्या डाव्या भुजेवर त्रिशुलाची खूण केली पाहिजे. आणि आपल्या नगराला वापस गेलो पाहिजे.

पद्मावती : माझ्या गळ्यातला नवरत्नाचा हार कोणी नेला असावा. तो हार त्या राजकुमारने नेला असावा. तो हार राजकुमार कशाला नेणार. हा जो हार नेला असेल तर तो त्या ठकाई मावशीने. कोणाच्या तरी साहाय्याने नेला असावा. कारण ती आपल्या घरी येत नव्हती. परंतु ती आता दररोज येत होती.

मावशी : पद्मावती, तू दु:खात का आहे?

पद्मा : मावशी, माझा नवरत्नाचा हार चोरी गेला आहे. आणि हार तुनेच नेला असावा मावशी. चाल तुझ्या झोपडीत.

पद्मा : मावशी, दार उघड.

मावशी : दार कायनं उघडू पद्मा.

पद्मा : कुलपाला किल्ली असते मावशी.

मावशी : यक किल्ली कमरतून घसरून पडली पद्मा.

पद्मा : कुलपाला किल्ल्या दोन असते मावशी.

मावशी : यक किल्ली होती पद्मा ते बुढ्याबरोबर गेली. आनं दुसरी कमरेतून घसरून पडली.

पद्मा : दार उघड मावशी.

मावशी : उघडतो बाप्पा. पाय बाप्पा माह्या झोपडीत. तिनच मडके हाये बाप्पा.

पद्मा : वरच्या मडक्यात काय आहे मावशी?

मावशी : वरच्या मडक्यात मीठ आहे पद्मा.

पद्मा : मधातल्या मडक्यात काय आहे मावशी?

मावशी : मंधातल्या मडक्यात मिरचे हाये पद्मा.

पद्मा : आणि खालच्या मडक्यात काय आहे मावशी?

मावशी : खालच्या मडक्यात थोडसं पीठ हाये बाप्पा.

पद्मा : मावशी, हार गेला तरी काही हरकत नाही; पण आता मात्र मी घरी गेली तर माझे वडील मला फार रागावतील. मारून मला काढून दिल्याशिवाय राहाणार नाही. आता तू ही दु:खाची बातमी माझ्या वडिलाला जाऊन सांग.

मावशी : हो पद्मा. लवकर जाते आणि लवकर सांगते.

पद्मा : जा मावशी आणि लवकर सांग.

**(मावशी बातमी सांगायला जाते)**

मावशी : राजेसाहेब, राजेसाहेब, आपल्या लाडक्या पद्मावतीच्या गळ्यातला नवरत्नाचा हार कोणीतरी चोरून नेलेला आहे. तरी पण ती फार दु:खात आहे.

मावशी : काय मनुगी नोका.

दंतपाल : काहीच म्हणत नाही मावशी. तू जा मावशी.

मावशी : जातो बाप्पा.

दंतपाल : शिपाई अलीकडे.

शिपाई : हो महाराज, आता जातो महाराज.

शिपाई : अहो, भाई हो. आमच्या लाडक्या पद्मावतीचा नवरत्नाचा हार चोरी गेला आहे. तर कुणाला मिळाला असेल तर त्याने तो हार राजवाड्याला आणून दिल्यास दहा हजार रूपये बक्षीस दिल्या जाईन हो भाई..

बिरबल : राजकुमार, मी सांगितली कामगिरी परिपूर्ण केली काय?

राजकुमार : होय मित्रा.

बिरबल : ती कामगीरी कशी काय केली, ते मला लवकरात लवकर सांग.

राजकुमार : मित्रा, मी तुला लवकर सांगतो. मित्रा, मी तिच्या गळ्यातला नवरत्नाचा हार काढून तिच्या डाव्या भुजेवर त्रिशुलाची खूण केली मित्रा.

बिरबल : बघु तो हार.

राजकुमार : बघ मित्रा.

बिरबल : अरे मित्रा, हा हार माझ्याकडे दे. मी याला विकून याचे कमीत कमी १०००० रूपये यावे म्हणून तू मशान घाटात शंकराचे तप करीत राय.

राजकुमार : होय मित्रा. मी इथेच शंकराचे तप करीत राहातो.

**(राजकुमार नवरत्नाचा हार बिरबलला देऊन वापस जातो)**
**(इकडे बिरबल शेटजीच्या वाड्यात येतो)**

बिरबल : शेटजी, अहो शेटजी. घरी आहे का?

शेटजी : कोण आहे रे माझ्या वाड्यासमोर.

बिरबल : मी परदेशी आहो.

शेटजी : कशाला आला तू माझ्या वाड्यासमोर.

बिरबल : शेटजी, मी नवरत्नाचा हार आणला आहे.

शेटजी : पाहू दे तो हार. किती रूपये हवे आहे या हाराचे?

बिरबल : दहा हजार रूपये हवे आहे शेटजी.

शेटजी : मी या हाराचे तीन हजार रूपये देतो.

बिरबल : बरं, पाच हजार देऊन द्या.

**(इतक्यात शिपाई येतो)**

शिपाई : शेटजी, हा हार तुम्ही कोठून आणला आहे.

शेटजी : शिपाई, हा हार मी परदेशी जवळून घेतला आहे.

शिपाई : तर तो कोठे आहे परदेशी?

शेटजी : तो पाहा तुमच्या बाजूला आहे.

शिपाई : अरे परदेशी, हा हार कोणाचा आहे.

परदेशी : शिपाई, हा हार कोणाच्या हाती आहे.

शिपाई : हा हार शेटजीच्या हाती आहे. अरे परदेशी, हा हार तुनेच आणलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| शेटजी | : | शिपाई, हा हार मी आणला नाही. हा हार या परदेशीने माझ्या दुकानात आणलेला आहे. म्हणून मी तो हार हाती घेतलेला आहे महाराज. |
| शिपाई | : | अरे परदेशी, तुला लवकर बोलावत आहे. |
| परदेशी | : | आता तुला खरोखरच सांगतो. हा हार माझ्या गुरुने आणला आहे. |
| शिपाई | : | कुठे आहे तुझा गुरू. |
| परदेशी | : | माझा गुरू मशान घाटात शंकराचे तप करीत आहे. |
| शिपाई | : | चाल तुझ्या गुरूकडे. महाराज, अहो महाराज. |
| गुरुदेव | : | बंम बंम भोले. कोण है बे साले. |
| शिपाई | : | हा तुहा चेला आणि मी शिपाई. |
| गुरुदेव | : | कसे आले ते मला लवकरात लवकर सांगा. |
| शिपाई | : | गुरू महाराज, हा जो नवरत्नाचा हार तुम्ही चोरून आणलेला आहे. आणि तो हार तुम्ही तुमच्या चेल्याजवळ दिला आहे. |
| गुरुदेव | : | अरे मला चेला नाही व गुरूसुद्धा नाही. आणि हार मी चोरून आणला नाही. |
| परदेशी | : | नाही महाराज, हा हार यानेच माझ्याजवळ दिला आहे महाराज. |
| शिपाई | : | गुरू महाराज, हा हार आमच्या लाडक्या पद्मावतीचा आहे. |
| गुरुदेव | : | महाराज, आता मी खरोखरच सांगतो. महाराज हा नवरत्नाचा हार मी शंकराचे तप करीत असताना एका भुताने तो माझ्या गळ्यात आणून टाकलेला आहे. व मी भूताच्या उजव्या भुजेवर त्रिशुलाची खूणसुद्धा केली आहे महाराज. |
| शिपाई | : | तर ही बातमी आपल्या राजाला (दंतपाल) जाऊन सांगितली पाहिजे. |

दंतपाल : अरे शिपाई, ह्या हाराचे कसे काय झाले.

शिपाई : महाराज, हा हार गुरू महाराज मशान घाटात शंकराचे तप करीत असताना भुताने त्याच्या गळ्यात टाकलेला आहे. आणि त्याने मग त्या भुताच्या डाव्या भुजेवर त्रिशुलाने खूण मारली आहे.

दंतपाल : अरे शिपाई, तू लवकर नगरात जाऊन सर्व स्त्री–पुरुषांच्या भुजेवर त्रिशुलाची खूण असेल तर लवकरात लवकर पाहून ये. कारण हा हार कोण्यातरी स्त्रिने किंवा माणसाने टाकला असावा.

शिपाई : होय महाराज. लवकर जातो.

दंतपाल : अजून आपला शिपाई आलेला नाही. कसे काय आहे.

शिपाई : महाराज, सर्व नगरी बघितली; पण एकाच्याही भुजेवर त्रिशुलाची खूण दिसली नाही महाराज.

दंतपाल : अरे शिपाई, तुने सर्व नगरी पाहिली; पण आता त्या पद्मावतीच्या भुजेवर चौकशी करून ये.

शिपाई : होय महाराज, लवकरात लवकर जातो. बाई पद्मावती भिण्याचे काहीच कारण नाही. फक्त तुझ्या डाव्या हातावरचा पदर दूर करून मला तुझी भूज दाखव.

पद्मा : अरे, आजपर्यंत मला कोणीच काही म्हणाले नाही. आणि आज यांनी माझ्या भुजेवर काय बघितले.

शिपाई : महाराज, आपल्या पद्मावतीनेच हार दिला. कारण त्रिशुलाची खूण पद्मावतीच्या भुजेवर आहे.

दंतपाल : पद्मावती, तुझा डावा पदर दूर कर.

**(पद्मावती दंतपालाला आपली भुज दाखविते)**

दंतपाल : मुली, तुने माझ्या राजवंशाला डाग लावला आहे. तू माझ्या वाड्याबाहेर चालती हो.

दंतपाल : शिपाई अलिकडे.

शिपाई : आज्ञा महाराज. कोणती कामगिरी आहे ते मला लवकरात लवकर सांगा.

दंतपाल : अरे शिपाई, ह्या लाडक्या पद्मावतीला वनात नेऊन हिचे शिरच्छेदन कर. आणि तलवारीला रक्ताचा टिळा आणं. आणि लवकरात लवकर नगराला वापस ये.

शिपाई : हो महाराज, लवकर जातो आणि लवकरात लवकर नगरीला वापस येतो.

गाणे ..

चाल ग नेतो
चाल ग नेतो
वनी वधण्याला
राजाचा हुकूम तो झाला.

शिपाई : जर तुला कोण्या देवाचं नाव घ्याचं असेल तर लवकर घे, आणि मरण्यास तयार हो.

पद्मा : शिपाई, अशा घोर अरण्यात कोण्या देवाचे नाव घेऊ; आणि कोण्या देवाचा धावा करू?

पद्मा : गाणे ...

कोण्या देवाचे नाव मी घेऊ
कोण्या देवाचे पाय मी धरू

पद्मा : शिपाई, ज्याप्रमाणे मनुष्याला अंतकाळाच्या वेळी दोन घूट पाणी पाजतात. त्याचप्रमाणे मलाही दोन घूट पाणी पाजा.

पद्मा : गाणे...

अगोदर मला पाणी पाजावे
नंतर माझे शिर वधावे

शिपाई : इथे माणसाचा वारा नाही, पाखराचा चारा सुद्धा नाही. अशा दाट अरण्यात पाणी कसे काय पाजणार मी तुला.

शिपाई : बाई, तू कशाची भिती धरू नको. मी तुला वनाला सोडून देतो, आणि आपल्या नगराला वापस जातो.

पद्‌मा : शिपाई, राजेसाहेब तुला नौकरीतून काढून दिल्याशिवाय राहणार नाही.

शिपाई : बाई, मी एखांद्या हरणाची शिकार करीन; आणि आपल्या नगराला वापस जाईन.

गाणे ...

बाई येते मला तुझी किवं
नाही घेणारं तुझा जीवं, माझे बाई

शिकार करीनं मी हरणीची
रक्त लावीनं तलवारीशी, माझे बाई

तुला सोडून देतो वनाला
वापस जातो आपल्या नगराला, माझे बाई

शिपाई : बाई, तू आता इथे राहा. आणि मी आपल्या नगराला वापस जातो.

**(पद्‌मावती वनदेवीच्या देवळात राहाते. राजकुमार, बिरबल व शिपाई हे तिघेही त्या वनात शिकार करण्यास गेले असताना ती त्यांना दिसते. राजकुमार आवाज देतो)**

राजकुमार : अगं ये मुली, तू कोण आहेस?

पद्‌मा : मित्रा, मी एक वनवासी आहे.

राजकुमार : तू इथे कशी काय आली? ते मला लवकर सांग.

पद्‌मा : बंधु, तुम्ही कोण आहे?

राजकुमार : मुली, आम्ही राजकुमार आहोत.

पद्‌मा : कोण? राजकुमार. तुम्ही माझा नवरत्नाचा हार नेला, आणि माझ्यावर आता अशी दशा आली.

राजकुमार : मुली, आपण आता या वनदेवीच्या देवळात जाऊन तिथे आपले लग्न करू.

**(राजकुमार व पद्मा वनदेवीचा आशीर्वाद घेतात.)**

वनदेवी : राजकुमार, तू मला संतासारखा सज्जन दिसतो, म्हणून तुझे नाव संतसेन असे ठेवते. व पद्मावती तू गंगेसारखी निर्मळ आहे; आणि पाण्यासारखी पातळ दिसत आहे, म्हणून तुझे नाव गंगासागर असे ठेवित आहे. आणि तुला पाठिंबा म्हणून तू आपल्या मित्राला (बिरबलाला) दिवाण म्हणून ठेव.

**(गंगासागर वनदेवीला आरती करते)**

## ........... अंक पहिला समाप्त...........



# अंक दुसरा

दिवाण : गाणे... शंकावती या नगरीचा राजा संतसेनं
त्याचा मी बिरबलं दिवाणं.

शिपाई : गाणे... आहोका बहुत हुशारं
दिवाणा शिपाई सरदारं.

दिवाण : गाणे... धनद्रव्याला नाही त्याला कमी.
गंगासागरं होय त्याची राणी.

शिपाई : गाणे ... कमरेला पट्टा हाती तलवारं
शिपाई सरदारं, दिवाणा बहुतं हुशारं.

दिवाण : सर्व प्रजेना कळविण्यात येत आहे की, आजपासून माझा मित्र हा राजा झाला आहे. आणि मी त्याचा दिवाण झालो आहे. आणि पाठिंबा म्हणून शिपाई सरदार आहे.

राजा : बिरबल, आजपर्यंत आपण दोघेही मित्र होतो. पण मी आता शंकावती नगरीचा राजा झालो आहो. आता तुझी माझी मैत्री कायम राहावी म्हणून, यासाठी तुला दिवाण म्हणून ठेवित आहो. हा टोप घे दिवाण, आणि हा पोशाख घे. आणि तुला पाठिंबा म्हणून शिपाई ठेवत आहो.

दिवाण : आज मी राजाचा व राणीचा संपूर्ण परिचय करून देत आहो.

गाणे...

संतसेनं आहे त्याचे नावं
गंगासागरं होय त्याची राणी

गंगासागरं होय त्याची राणी
तिची किर्ती विचारा कोणी.

शिपाई : गाणे...

आहोका बहुतं हुशारं
दिवाणा शिपाई सरदारं.

राजा : माझे गंगासागर राणी. आपल्याला धनद्रव्याला काहीच कमी नाही. परंतु तू नेहमी दु:खात का असते, ते मला लवकर सांग?

गंगासागर : प्राणनाथा, मी दु:खात असेल ते तुम्हाला समजत नाही. माझे दु:ख जर तुम्हाला सांगितले तर तुम्हाला सुद्धा दु:ख होईल.

राजा : गाणे...

गंगासागरं माझे ग राणी, माझे राणी
कायं विचारं करते मनी
धनद्रव्याला नाही ग कमी
कायं विचारं करते मनी.

गंगासागर : प्राणनाथा, आज आपल्या लग्नाला दहा वर्ष झाले आहे. तरीपण संतती नाही. आपल्या घरासमोर सर्व बायांना मुले आहेत. आणि त्या मला येऊन बोलतात.

राजा : माझे गंगासागर राणी. आपल्याला पुत्र नाही. त्याची तू काहीच काळजी करू नको.

गंगासागर : गाणे ...

कायं सांगू जी प्राणनाथा, जी प्राणनाथा
दु:ख वाटते, दु:ख वाटते माझ्या मनाला
तुम्ही करा कोणता उपायं प्राणनाथा
खरं सांगतो प्राणनाथा, जी प्राणनाथा
तुम्ही ज्योतिष्य पाहावे आता
काय सांगू जी प्राणनाथा, जी प्राणनाथा
दु:ख वाटते, दु:ख वाटते माझ्या मनाला.

राजा : दिवाण अलिकडे.

दिवाण : आज्ञा महाराज. कोणती कामगिरी आहे ते मला लवकरात लवकर सांगा.

राजा : अरे दिवाण, आपल्या नगराच्या ज्योतिष्याला जाऊन सांग की, आपल्या राजाचे संपूर्ण जीवनाचे ज्योतिष्य पाहायचे आहे. तर ज्योतिष्य महाराजाला लवकर बोलावून आण.

दिवाण : होय महाराज.

दिवाण : ज्योतिष्य महाराज. अहो ज्योतिष्य महाराज.

ज्योतिषी : कोण आहे माझ्या कचेरीसमोर.

दिवाण : महाराज, मी दिवाण आहो ज्योतिष्य महाराज. आमच्या राजाचे संपूर्ण जीवनाचे ज्योतिष्य बघायचे आहे, तर तुम्हाला बोलाविले.

ज्योतिषी : होय महाराज. मला संपूर्ण जीवनाचे ज्योतिष्य बघता येते.

दिवाण : तर मग चला आमच्या वाड्याला.

ज्योतिषी : गाणे...

कायं अन्यायं राजाचा केला
कशासाठी नेतो वाड्याला

दिवाण : गाणे...

काही अन्यायं नाही केला
चाला ज्योतिष्य पाहाण्याला.

ज्योतिषी : अरे दिवाण, मी येण्यास तयार आहो. पण मला नेण्यास काय आणले?

दिवाण : महाराज, मी नेण्याकरिता काहीच आणले नाही. पण रस्ता सरळ आणि चांगला आहे.

ज्योतिषी : तर मग चाल लवकर.

## (दिवाण व ज्योतिषी मार्गाने लागतो)

ज्योतिषी : अरे अरे! दिवाणा. तुने मला फसविले आहे.

दिवाण : महाराज थांबा, मी रस्ता चुकलो आहे, आणि त्यामुळे आपला पायात पाय अडकून तुम्ही पडले आहे. पण महाराज यापलिकडे रस्ता अगदी सोपा आहे.

ज्योतिषी : तर मग चाल लवकर.

दिवाण : बघा महाराज, आपल्या राजाचा राजवाडा. राजेसाहेब तुमच्या हुकमाप्रमाणे मी ज्योतिष्य महाराजाला बोलावून आणले आहे.

राजा : तुम्हीच काय ज्योतिष्यकार?

जोतिषी : होय महाराज, आम्हीच ज्योतिष्यकार आहो.

राजा : ज्योतिष्य महाराज, तुम्हास पूर्ण जीवनाचे ज्योतिष्य बघता येते का?

जोतिषी : होय महाराज. आम्हाला पूर्ण जीवनाचे ज्योतिष्य बघता येते. पाहू द्या तुमचा हात. अरे अरे! महाराज तुम्हाला धनद्रव्याला काहीच कमी नाही; परंतु तुमच्या हाताच्या धनरेषावर तुम्हाला पुत्रफळ नाही आहे महाराज. पण आता मी पंचागणात तुमच्या जीवनाचे जोतिष्य बघत आहो महाराज.

ज्योतिषी : तर मग बसा महाराज. मी ज्योतिष्य पाहतो.

राजा : तर मग लवकर पाहा.

ज्योतिषी : गाणे...

पहिले पानं मी पाहिले, पाहिले
राजाचे ज्योतिष्य नाही मिळाले

दुसरे पानं मी पाहिले, पाहिले
राजाचे ज्योतिष्य नाही मिळाले

तिसरे पानं मी पाहिले, पाहिले
राजाचे ज्योतिष्य नाही मिळाले

चौथे पानं मी पाहिले, पाहिले
राजाचे ज्योतिष्य नाही मिळाले

राजाचे ज्योतिष्य नाही मिळाले
राजाचे ज्योतिष्य नाही मिळाले

ज्योतिषी : महाराज, मी तुमच्या जीवनाचे माझ्या पंचागणाचे चार पाने पाहिले महाराज; पण यामध्ये काहीही दिसत नाही. पण आता मी शेवटचे पान बघीत आहो महाराज.

गाणे...

पाचवे पानं मी पाहिले, पाहिले
राजाचे भविष्य मला मिळाले

ज्योतिषी : महाराज, तुम्ही काही काळजी करू नका. तुमचे भविष्य मला मिळालेले आहे महाराज.

राजा : ज्योतिष्यकार महाराज, ते कसे काय आहे? ते मला लवकर सांगा.

ज्योतिषी : महाराज तुमच्या वंशाला पुत्रफळ आहे, पण ते फार कठीण आहे.

राजा : ते कसले कठीण आहे, ते मला लवकर सांग.

ज्योतिषी : महाराज, तुम्हाला पुत्रफळ हवे आहे तर, तुम्हाला सहा महिने वनात जाऊन शंकराचे तप करावे लागेल महाराज.

राजा : काही हरकत नाही महाराज.

ज्योतिषी : तर मग आमची दक्षिणा द्या महाराज.

राजा : तर मग घ्या महाराज.

ज्योतिषी : गाणे...

आम्ही जोतिष्य जोतिष्य पाहाणार
आमचे खोटे नाही होणार

आमचा धंदा तो, धंदा तो नेमून दिला
आमचे खोटे नाही होणार

राजा : माझे गंगासागर राणी. मी आपल्या जीवनाचे संपूर्ण जोतिष्य बघितले आहे. आपल्या वंशाला पुत्रफळ आहे, परंतु ते फार कठीण आहे. मला सहा महिने शंकराचे तप करावे लागेल.

गंगासागर : प्राणनाथा, तुम्ही पुत्रफळ आणण्यासाठी लवकर वनी तपाला जावे.

राजा : गाणे...

गळ्यातली राणी गळसुरी तोडं, गळसुरी तोडं
हातातल्या राणी बांगड्या फोडं
हातातल्या राणी बांगड्या फोडं
कपाळाचे राणी कुंकू ग मोडं, कुंकू ग मोडं
सहा महिने माझी आशा ग सोडं

गंगासागर : प्राणनाथा, मला दु:खी करू नका. तुम्ही कोणताही विचार न करता तपाला जा.

राजा : माझे गंगासागर राणी, मला जावेच लागेल.

गंगासागर : गाणे...

दु:खी करू नका प्राणनाथा, जी प्राणनाथा
परमेश्वर जी, परमेश्वर जी आहे पाठीराखा
तुम्ही जावे आता आनंदाने प्राणनाथा
पुत्रफळं आणा शोधूनं प्राणनाथा
दु:खी करू नका प्राणनाथा, जी प्राणनाथा
परमेश्वर जी, परमेश्वर आहे पाठीराखा

राजा : माझे गंगासागर राणी. तू आपल्या वाड्याला वापस जा.

राजा : गाणे...

ऐका प्रज्यांनो माझा नमस्कार, माझा नमस्कार
आजची सभा मी बंदं करणारं

मी आजं जातो वनी तपाला, वनी तपाला
शंकराला प्रसन्न करण्याला, प्रसन्न करण्याला

शंकराला प्रसन्न करूनं, प्रसन्न करूनं
पोटी पुत्रफळं आणीनं मागूनं, आणीनं मागूनं

आपल्या नगराला वापसं येऊनं, वापसं येऊनं
नंतर सर्वांच्या भेटी घेईनं

राजा : दिवाण अलिकडं.

दिवाण : आज्ञा महाराज. कोणती कामगिरी आहे, ते मला लवकरात लवकर सांगा?

राजा : अरे दिवाण, आपल्या शिपायाला जाऊन सांग की, आपले राजेसाहेब वनी तपाला जात आहे. तरी चार शामकर्ण घोडे व त्याला रथ जुंपून कचेरी समोर पाठवून दे.

(शामकर्ण घोडा – ज्या घोड्याचे शरीर पांढरे शुभ्र व कान काळे असते. त्या घोड्याला शामकर्णी घोडे असे म्हणतात. शामकर्णी घोडे संख्येने कमी आढळतात. राजे आपल्या तबेल्यात असे घोडे ठेवत. असे उल्लेख लोककथांत येतात.)

दिवाण : होय महाराज.

शिपाई : महाराज, तुमच्या हुकमाप्रमाणे मी रथ आणला आहे. यात बसा.

शिपाई : गाणे....

घोडे जुंपीले, जुंपीले रथाला दोनं
रथं लाविला वनी मार्गानं
घोडे चालते, चालते दुडकी चालं
रथं लाविला वनी मार्गानं

शिपाई : महाराज, येथे शंकराचे पिंडं दिसत आहे. इथेच तुम्ही शंकराचे तप करा.

राजा : अरे शिपाया, आपल्या नगराला जाऊन दिवाणाला सांग की, आपल्या प्रजेवर चांगल्या तऱ्हेने लक्ष ठेव.

शंकरजी : अरे, माझ्या सिंहासनावर कोण तपस्वी राजा बसला आहे? अरे राजा, माझा सिंहासन फार डोलू लागला.

शंकरजी : गाणे ....

कोणं राजा तपी बसला,
माझा सिंहासनं डोलीला
कायं कमी असेनं राजाला
म्हणून त्याने माझा धावा केला
मागूनं घ्यावे अशा वेळेला

राजा : शंकरा, मला धनद्रव्याला काहीच कमी नाही. परंतु मला पुत्रफळ नाही म्हणून मी तुमचा धावा केला.

शंकरजी : महाराज, तुमच्या वंशाला पुत्रफळ नाही. तरी तुम्ही तुमच्या नगराला परत जावे.

राजा : गाणे...

पुत्रासाठी आहो भुकेला, आहो भुकेला
म्हणून तुझा मी धावा केला

शंकरजी : महाराज, तुम्हाला पुत्रप्राप्ती होते, परंतु ते फार कठीण आहे.

राजा : महाराज, कसलाही कठीण असला तरी हरकत नाही.

शंकरजी : द्या मला वचन.

राजा : घ्या देवा.

शंकरजी : राजा तुला पुत्रफळ आहे. पण तुझ्या जिवाला काळ आहे. राणीला सहा महिण्याचा गर्भ असताना तुला स्वर्गात यावे लागेल.

गाणे...

पुत्र आहे राजा तुझ्या वंशी
काळं आहे तुझ्या जीवनासी
महाराजा फळं देतो तुझ्या पदराला
गंगाराणीला खावयाला
सहा महिण्याचा गर्भ राणीला
तुला जावे लागेल स्वर्गाला

शंकरजी : राजा, हे पुत्रफळ घे.

**(राजा बाहेर येतो. शंकरजी वापस जातो)**

राजा : अरे गुराखी.

गुराखी : अरे कोण आहे? महाराज!

**(गुराखी महाराजाच्या पाया पडतो)**

राजा : अरे गुराखी, तू बैरा आहे काय?

गुराखी : नाही महाराज. मी बैरा नाही.

राजा : गुराखी, माझा एक निरोप नेशीनं काय?

गुराखी : कोणता? सांगा लवकर.

राजा : अरे गुराखी, माझ्या नगरीला जाऊन दिवाणाला सांग की, आपल्या राजाचे तप पूर्ण झाले आहे. तरी शिपायाच्या हाताने दोन शामकर्ण घोडे व त्याला एक रथ जुंपून लवकरात लवकर पाठवून दे.

गुराखी : होय महाराज.

राजा : कसे सांगशील?

गुराखी : आपला राजा सहा म्हशीचे तूप घेऊन आला आहे. तरी तुला दांडीपाडु घेऊन लवकरात लवकर बलावले.

राजा : अरे गुराखी, तसे नाही. आपला राजा सहा महिन्याचे तप करून आलेला आहे. तरी दोन शामकर्ण घोडे आणि त्याला एक रथ जुंपून लवकरात लवकर पाठवून दे.

गुराखी : होय महाराज.

राजा : कसे सांगशील.

गुराखी : तसेच, तसेच.

राजा : बरं, तुला जसे समजते तसे सांग.

गुराखी : होय महाराज.

**(गुराखी नगरीला वापस येतो)**

गुराखी : दिवाणसाहेब, अहो दिवाणसाहेब.

दिवाण : कोण आहे रे माझ्या कचेरीसमोर?

गुराखी : मी गुराखी आहो महाराज.

दिवाण : काय आहे गुराखी?

गुराखी : आपला राजा सहा म्हशीचे तूप घेऊन आला. तरी दांडीपाड्डे घेऊन तुम्हाले लवकरात लवकर बलावत आहे.

दिवाण : अरे गुराखी, तसे नसेल. आपला राजा सहा महिण्याचे तप करून आलेला असेल, तर दोन शामकर्ण घोडे आणि एक रथ घेऊन लवकरात लवकर बोलावित आहे.

गुराखी : होय, तसेच दिवाणसाहेब.

दिवाण : शिपाई अलिकडे.

शिपाई : आज्ञा महाराज. कोणती कामगिरी आहे ते मला लवकरात लवकर सांगा.

दिवाण : अरे शिपाई. आपल्या राजाचे तप पूर्ण झाले आहे. तरी दोन शामकर्ण घोडे व त्याला एक रथ जुंपून लवकरात लवकर वनाच्या मार्गाने जा.

शिपाई : होय महाराज. लवकर जातो.

शिपाई : गाणे....

घोडे जुंपीले, जुंपीले रथाला दोनं
रथं लावला वनी मार्गानं
राजा बघत असेल,
बघत असेल आपली वाटं
घोडे चालते दुडकी चालं

शिपाई : याच अरण्यात असले पाहिजे आपले राजेसाहेब.

**(शिपाई इकडे तिकडे बघतो)**

शिपाई : तुमच्या हुकमाप्रमाणे रथ आणलेला आहे महाराज. बसा या रथात

**(राजा रथात बसतो)**

शिपाई : गाणे...

घोडे जुंपीले, जुंपीले रथाला दोनं
घोडे चालते दुडकी चालं

शिपाई : महाराज, आलेली आहे आपली नगरी.

राजा : दिवाण अलिकडे.

दिवाण : आज्ञा महाराज. काय आहे ते मला लवकर सांगा.

राजा : आपल्या नगरीत जाऊन गंगाराणीला लवकर पंचआरती घेऊन आपल्या कचेरीसमोर पाठवून दे.

**(दिवाण नगरीत जातो)**

दिवाण : राणीसाहेब, आपले राजे तपावरून आलेले आहे. तरी पंचआरती घेऊन लवकरात लवकर बोलावित आहे.

**(राणी पंचआरती घेऊन नगरीत जाते)**

गंगासागर : गाणे...

पंचआरती केली तयारं, केली तयारं
चालं दिवाणा लवकरं, लवकरं

गंगासागर : दिवाण, पंचआरती तयार केलेली आहे. तरी पण आता नगराला लवकर चल.

गंगासागर : गाणे...

पंचआरती केली तयारं, केली तयारं
चालं दिवाणा लवकरं
आपल्या राजाला ओवाळीनं
सहा महिण्याचे तप करूनं, तप करूनं
आपला राजा ग आला चालूनं
अगोदर त्याचे पायं धुईनं, पायं धुईनं
नंतर त्याचे तीर्थ घेईनं, घेईनं

गंगासागर : प्राणनाथा, तुम्ही तपाला गेले असता, तुम्ही काय आणले ते माझ्या आरतीत टाका.

**(राजा आरतीत फळ टाकतो)**

गंगासागर : गाणे...

मनी करू नका अनमानं, जी अनमानं
फळं खाते मी, फळं खाते मी आनंदानं

फळं दिले आम्हा शंकरानं, शंकरानं
कृपा केली आम्हा देवानं, देवानं

मनी करू नका अनमानं, जी अनमानं
फळं खाते मी, फळं खाते मी आनंदानं

राजा : गाणे...

ऐकं दिवाणा, दिवाणा सांगतो तुला
गेलो होतो रे, गेलो होतो रे वनी तपाला

शंकराला रे, शंकराला रे प्रसन्न करण्याला
पोटी पुत्र रे, पुत्रफळं रे मागण्याला

शंकराला रे, शंकराला प्रसन्न करूनं
पोटी पुत्र रे, पुत्रफळं आणले मागूनं

पुत्र आहे रे, आहे माझ्या वंशाला
काळं आहे रे, आहे माझ्या जिवाला

सहा महिण्याचा, महिण्याचा गर्भ राणीला
मला जावे रे, जावे लागेलं स्वर्गाला

शंकराला रे, शंकराला वचनं मी दिले
नाही होणार रे, होणारं भ्रष्ट वचनाले

दिवाण : अशी दु:खाची बातमी सांगून माझे मन दु:खी करू नका.

दिवाण : गाणे...

बालपणीच्या माझ्या मितरा, मितरा
कैसे जाता तुम्ही स्वर्गाला
कैसे जाता तुम्ही स्वर्गाला
फारं दु:ख होते माझ्या मनाला

दिवाण : महाराज, तुम्ही स्वर्गाला जाता म्हणता. याचे मला फार दु:ख वाटत आहे.

राजा : अरे दिवाण, मी शंकराला वचन दिले आहे.

राजा : गाणे...

आता आणा दवूतं लेखनी, दवूतं लेखनी
सोडले सर्व धनावर पाणी

दिवाण : महाराज, तुम्ही धनावर पाणी सोडू नका.

राजा : गाणे...

दत्तकपत्र करूनं देतो तुला
प्रजा राहीनं तुझ्या हुकमाला दिवाणा
प्रजेवरं पडेलं तुझा दावं
प्रजा राहीलं तुझ्या हुकुमाला

दिवाण : महाराज तुम्ही मला दत्तकपत्र करून दिले. परंतु याच्यावर तुम्ही आपली सही द्या.

राजा : माझ्या सहीची काहीच गरज नाही.

राजा : गाणे...

अहो बिरबलजी बिरबलजी,
चाललो स्वर्गाला
प्रजा राहीनं तुझ्या हुकुमाला

**(दिवाण आनंदाची बातमी कलावतीला सांगतो)**

# ............अंक दुसरा समाप्त...................



# अंक तिसरा

दिवाण : आता आनंदाची बातमी कलावतीला सांगितली पाहिजे. कमलावती, अगं ये कमलावती.

कमलावती : काय आहे प्राणनाथा.

दिवाण : तुला ही आनंदाची बातमी कळली काय?

कमलावती : नाही प्राणनाथा. मला काहीच कळले नाही.

दिवाण : गाणे...

राजा गेला या स्वर्गाला
आनंद झाला माझ्या मनाला
कमलाई, येतो मी घाई घाई
धनाच्या लोभापायी
आजपासून धनी मी झालो,
झालो या राज्याचा गं
आनंदाने सांभाळ करू,
आपण या प्रजेचा गं
आनंदाने राज्य करू,
राजप्रजा सुखी करू
कमलाई येतो मी घाई घाई,
धनाच्या लोभापायी

कमलावती : प्राणनाथा, तुम्हाला आनंद झाला. परंतु मला फार दु:ख होत आहे.

कमलावती : गाणे...

राज्य कैसेजी कैसेजी राज्य तुमचे
राज्य होयेजी होयेजी गंगाराणीचे

राज्य नोहेजी नोहेजी तुमच्या बापाचे
राज्य होयेजी होयेजी गंगाराणीचे

सहा महिन्याचा महिन्याचा गर्भ राणीला
धनी होईलं होईलं या राज्याला

राज्य कैसेजी कैसेजी राज्य तुमचे
राज्य होयेजी होयेजी गंगाराणीचे.

दिवाण : कमलावती, तू त्या गंगाराणीचा पक्ष घेऊन बोलू नकोस. तू जर तिचा पक्ष घेऊन बोलशीनं तर तुला सुद्धा वाड्याबाहेर काढून देईल. हे राज्य तिचे नसून माझे आहे.

दिवाण : गाणे...

ऐकं राणी मी सांगतो तुला
धनी झालो मी राज्याचा, माझे राणी

गंगासागरं या राणीला
कायडूनं देतो अशा वेळेला, माझे राणी

कमलावती : प्राणनाथा, हे राज्य आपले नसून त्या गंगाराणीचे आहे. कारण आपण तिच्या उष्ट्या अन्नावर जगलो आहो.

कमलावती : गाणे ...

कायडू नोकाजी राणीबाईला
पापं घडेलं तुमच्या हाताला

राज्य संपत्ती राणीबाईची
यावर सत्ता नाहीजी तुमची

दिवाण : कमलावती, तू त्या पापी गंगासागरचा पक्ष घेऊन बोलसीन तर तुला सुद्धा वाड्याबाहेर कायडून देईल.

दिवाण : गाणे...

गंगाराणीचा पक्ष घेऊनं
बोलतेसं मोठ्या दिमाखानं
एका भुक्कीनं तोंडं फोडीनं, तोंडं फोडीनं
वाड्याबाहेरं तुला कायढूनं देईनं

कमलावती : आता आपले प्राणनाथ आयकत नाही. तरी ही हकीकत आपल्या राणीला कळवली पाहिजे.

कमलावती : गाणे...

आज उशीर फार झाला, फारं झाला
आता जाईन जाईन धुणे धुवाला

सांगीन आपल्या सकुला, सकुला
राजा माझा गादीवरं आला ग बाई आला

गंगासागर : कमलावती, आजपर्यंत तुला धुनं धुन्याकरिता येवढा उशीर होत नव्हता. आणि आज तुला का उशीर झाला.

कमलावती : गंगासागरबाई, आज दुःखाची बातमी आलेली आहे. म्हणून मला धुनं धुन्याकरता उशीर झाला आहे. तुझे प्राणनाथ स्वर्गात गेले आणि माझे प्राणनाथ गादीवर आले.

गंगासागर : गाणे...

माझा देवराया कुठं गेला वो कमलावती
कोण्या काळाने, कोण्या काळाने कोपविला

कशी ठेवली मला एकटीला एकटीला
कसे निघून गेले स्वर्गाला स्वर्गाला

माझा देवराया कुठं गेला वो कमलावती
कोण्या काळाने कोण्या काळाने कोपविला

खरे सांगवो कमलावती वो कमलावती
कुठे गेला वो कुठे गेला वो माझा पती

कमलावती : तुझे प्राणनाथ स्वर्गाला गेले; आणि माझे प्राणनाथ गादीवर आहे.

गंगासागर : चला आता ही सर्व हकीकत आपल्या लाडक्या दिवाणाला विचारली पाहिजे. अरे दिवाण, अरे दिवाणा.

दिवाण : कोण आहे माझ्या कचेरीसमोर

गंगासागर : मीचं आहे गंगासागर.

दिवाण : कशासाठी आली माझ्या कचेरीसमोर.

गंगासागर : माझे प्राणनाथ कुठे गेले आहे, ते मला लवकरात लवकर सांग.

दिवाण : तुझे प्राणनाथ कुठे गेले ते मला काहीच माहित नाही.

**(दिवाण गंगाराणीला मारहाण करून बाहेर काढून देतो)**

गंगासागर : गाणे...

मारू नको रे दिवाणा मला
कायं अन्यायं तुझा मी केला ।। १ ।।

बाळं म्हणुनी तुला पोसिला
काळं आला रे माझ्या जिवाला ।। २ ।।

राहू देरे मला तुझ्या पायासी
तुझ्या चरणाची होईलं दासी ।। ३ ।।

येऊ देरे दिवाणा दया
मी का पडते तुझ्या पाया ।। ४ ।।

मारं मारूनं घेते का जीवं
नाही येतं रे दिवाणा कीवं ।। ५ ।।

अशी पापीणं का मी झाली
लहानपणी नाही देवानं नेली ।। ६ ।।

काही शरमं नाही रे तुला
चालूनं आला रे माझ्या अंगाला ।। ७ ।।

करते विनंती हातं जोडुनी
मस्तकं ठेविते तुझ्या चरणी ।। ८ ।।

गंगासागर : दिवाणा, मी तुझ्या पाया पडते.

दिवाण : खोटेनाटे बोलू नका, आणि लाड काही लावू नका.

दिवाण : गाणे...

सोडं सोडं ग माझा शिनगारं, माझा शिनगारं
मार्ग वनाचा तू ग धरं

सोडं सोडं ग चोळी लुगडं, चोळी लुगडं
मार्ग वनाचा तू ग धरं

उतरून ठेवं माझा शिनगारं, माझा शिनगारं
मार्ग वनाचा तू ग धरं

गंगासागर : माझा शिनगार उतरून ठेवत नाही आणि मार्ग वनाचा धरत नाही. दिवाणा हा शिनगार माझ्या पतीने चढवलेला आहे. आणि तो मी कसे काय उतरवणार. (शिनगार – शृंगार)

दिवाण : माझा शिनगार मलाच उतरवाला काहीच हरकत नाही.

शिपाई अलिकडे.

शिपाई : आज्ञा महाराज. कोणती कामगिरी आहे ते मला लवकर सांगा.

दिवाण : शिपाई, या पापी दुष्ट गंगासागर राणीला वनामध्ये नेऊन इचे शिरछेदन कर. आणि तुझ्या तलवारीला रक्ताचा टिळा लावून आण.

शिपाई : हो महाराज, आता लवकर जातो आणि लवकर येतो.

शिपाई : गाणे...

चलं ग नेतो, चलं ग नेतो
वनी वधन्याला, राजाचा हुकूम तो झाला

गंगासागर : अरे शिपाया, माझ्या माहेरची वाट. जाई मोगरा फुलाची आहे.

गंगासागर : गाणे...

रांज्या वाजते कारकीरं कारकीरं
वाघं सिंहाच्या गर्जना फारं गा शिपाया

पुढे आहे अरण्यं दाटं
मला सूचतं नाही वाटं गा शिपाया
( रांज्या – वेळू )

गंगासागर : अरे शिपाया, माझ्या माहेरची वाट अशी नसून जाई मोगरा अशा फुलाची आहे.

गंगासागर : गाणे...

माझ्या माहेरची वाट नाही अशी, नाही अशी
जाई मोगरा, जाई मोगरा आहे फुलाची

शिपाई : बाई, मी तुला तुझ्या माहेराला नेतो म्हणून सांगितले. परंतु मी तुला मारण्यास आणले आहे. तर हो आता मरण्यास तयार. आणि जर कोण्या देवाचे नाव घ्यायचे असेल तर लवकर घे. आणि मरण्यास तयार हो.

गंगासागर : गाणे ...

कोण्या देवाचे नाव मी घेऊ
कोण्या देवाचे पाय मी धरू

शिपाई : बाई, तुझी इच्छा कायच्यामध्ये आहे ते मला लवकर सांग.

गंगासागर : शिपाई, अंतकाळाच्या वेळेस दोन घुट पाणी पाजतात. तर तशाचप्रमाणे मला सुद्धा दोन घूट पाणी पाज.

गंगासागर : गाणे...

अगोदर मला पाणी पाजावे, पाणी पाजावे
नंतर माझे शिरं वधावे

शिपाई : बाई, माणसाचा वारा नाही, पाखराचा चारा नाही. अशा दाट अरण्यात मी तुला पाणी कुठून आणणार.

शिपाई : गाणे...

तुझी येते मला बाई किवं
नाही घेणारं तुझा जीवं, माझे बाई

तुला सोडून देतो वनाला
वापस जातो आपल्या नगराला, माझे बाई

गंगासागर : शिपाया, तू मला वनी सोडले. परंतु तुझे राजेसाहेब तुला नौकरीवरून कायढून देईन.

शिपाई : बाई, माझी नौकरी सुटली तरी काहीही हरकत नाही.

शिपाई : गाणे...

शिकार करीनं मी हरणीची, हरणीची
रक्तं लावीनं तलवारीशी, माझे बाई

तुला सोडूनं देतो वनाला
वापस जातो आपल्या नगराला, माझे बाई

दिवाण : शिपाई, मी सांगितली कामगिरी परिपूर्ण केली काय?

शिपाई : होय महाराज. कामगिरी पूर्ण केली.

दिवाण : वा शिपाई! माणसाकडे नौकर असावा तर असा असावा. शिपाई, तुला काय बक्षीस पाहिजे ते मला लवकर सांग.

शिपाई : मला फक्त दहा एकर जमीन पाहिजे.

दिवाण : अरे शिपाई, तुला दहा एकर जमीन पाहिजे, ते कशाकरता पाहिजे?

शिपाई : मला पाच एकर जमीन मकान बांधण्यासाठी पाहिजे, आणि पाच एकर जमीन परसाकडे जायला पाहिजे.

दिवाण : तुला पाच एकर जमीन मकान बांधण्याकरता आणि पाच एकर जमीन परसाकडे जाण्याकरता पाहिजे.

शिपाई : होय महाराज.

दिवाण : तर घे ही जमीन.

**(दिवाण शिपायाला जमीन बक्षीस देतो).**

**(पुढील प्रसंग हा पद्मावती नगरीतला आहे. दिवाण आणि राजा हा पद्मावती नगरीचा समजावा)**

वढर : तुले यवढा उशीर का लागला बे. आबे माया बायकोणं सयपाक नाही करून देला. बे लेका, तुया बायकोले झोडपा लागते लेका. आज आपण कोणचे तरी काम पायले पाहिजे. हो लेका, आपण काम पाहिले पायजे. तर लेका तू हाक मार बे. आबे लेका तूच हाक मार.

राजेसाहेब. आबे लेका तूच हाक मार ना.
राजेसाहेब, अहो राजेसाहेब.

दिवाण : तुम्ही कोण आहे रे.

वढर : आमी माणसं आहो.

दिवाण : काय काम आहे?

वढर : आमाले काम पायजे.

दिवाण : तुम्ही कोणते काम करता.

वढर : आमी जिते गाडतो आनं मेले काडतो.

दिवाण : तुमी जिते गाडता आनं मेले काढता. तर माझ्यापासी काम नाही तुमच्यासाठी

वढर : नाही महाराज, तुमच्या पाया पडतो. आमाले काम द्या.

दिवाण : अरे वढरहो. तुम्ही माझ्या दुरून चाला. तुम्हाला काम पाहिजे तर दुरून चाला. पूर्व ते पश्चिम, उत्तर ते दक्षिण.

वढर : महाराज, आम्हाला तसे समजत नाही.

दिवाण : तर मग कसे समजते.

वढर : उगवतं, डोंगरं आणि रूमणं

(उगवतं – पूर्व. डोंगरं – पश्चिम. रूमणं – औताला असलेला उभा दांडा.)

दिवाण : बरं, तर मग काम करा.

वढर : अरे मला फार भुक लागली रे.

धुडम्या : अरे तुला भुक लागली तर मी चवदा गाड्या घेऊन गेलो होतो. तवा म्या मशीन आणली.

वढर : अरे तूनं कायची मशीन आणली.

धुडम्या : आबे, तुले भुक लागलीनं. तर धर, घे टोप.

वढर : या टोपात काहीच नाही रे.

धुडम्या : आबे तू धरून त राय

वढर : का हाय बे. मसीन आणली मसीन आणली लावून रायला.

धुडम्या : आबे, त्या मसीनमंधी पेढा हाये.

वढर : तर मंग देनतं बे मले.

धुडम्या : आबे देतोनं.

वढर : बरं. कारे, आपण आता पगाराले गेलो पायजे. हो तर, चाल.

धुडम्या : गाणे...

चाल धुडम्या रे
चाल धुडम्या रे
जाऊ पगाराला
बारा वाजाचा टाईम झाला
बारा वाजाचा टाईम झाला.

वढर : दिवाणसाहेब, ओ दिवाणसाहेब.

दिवाण : कोण आहे रे माझ्या कचेरीसमोर.

वढर : आमी वढर आहो दिवाणसाहेब.

दिवाण : कशाकरता आले.

वढर : आमचा पगार घ्याले आलो.

दिवाण : काम पूर्ण झाले आहे का?

वढर : होय महाराज. काम पूर्ण झाले.

दिवाण : तर मग चाला काम पाहाण्याकरिता.

वढर : तर मग चाला.

दिवाण : अरे! तुम्ही तर माझ्यासमोर आले.

वढर : आमी तुमच्या आगुदर पोचलो महाराज.

दिवाण : अरे, पण मी टेप विसरलो.

वढर : महाराज, टेप आमच्या जवळ आहे.

दिवाण : तर पाहू द्या.

दिवाण : अरे, हा कोणता होय टेप.

वढर : हा टेप आमच्या आज्याबापापासून चालत आला आहे. तुमच्या हातानं चुकन, पण आमच्या टेपाने कवाच चुकणार नाही दिवाणसाहेब.

दिवाण : तर मग चला पगाराला.

वढर : तर चाला साहेब.

दिवाण : तर मग तुम्ही मला हे सांगा की, मोठा कोण आहे आणि लहान कोण आहे.

वढर : महाराज मी मोठा आहे. अरे नाही रे, मीचं मोठा आहे.

दिवाण : अरे तुम्ही कशाची भानगड लावली आहे रे.

वढर : महाराज, तुम्हीच सांगा कोण मोठा आहे.

दिवाण : मला तर धुडम्याच मोठा दिसत आहे. आणि तू मात्र लहान दिसत आहे. तर सातबाराने तू घे. आणि तू मोठा आहे तर

पावनेआठ तू घे. बाकी पैसे राहिले ते मग काम पूर्ण झाल्यानंतर. तुमचे राहिलेले पैसे नंतर देऊ. तर मग तुम्ही कामाला लागा. मी चाललो.

वढर : चाला महाराज, आम्ही राहिलेले काम पूर्ण करतो.

वढर : गाणे...

चाल धुडम्या रे
चाल धुडम्या रे
चाल माती टाकण्याला
बारा वाजाचा
बारा वाजाचा टाईम झाला.

**(इतक्यात गंगासागर येते)**

वढर : अरे, मला इतक्यात एक भूत दिसते. अरे ते भूत नसेल. कुणीतरी बाई असेल. तर मग त्या बाईजवळ जाऊन त्या बाईला आवाज दे.

वढर : बाई तू कोण आहे?

गंगासागर : बंधु, मी एक वनवासी आहे.

वढर : बाई, तू इथे कशी काय आली ते लवकर सांग.

गंगासागर : बंधु, मी या वनात कशी काय आली ते मी तुम्हाला सांगते.

वढर : तर मग सांग बाई लवकर.

गंगासागर : गाणे...

काय सांगू कर्म कहाणी
आईबाप नाही मला कोणी
फिरत फिरत आली मी वनी
वनवासी आहे माझा प्राण (प्राणनाथ,पती)
दिवाणाने मारं मारून, मारून
दिले वाड्याबाहेर कायडूनं.

वढर : बाई, तुझे नाव काय आहे ते लवकर सांग.

गंगासागर : बंधु, माझे नाव बेबीनंदा आहे. मला दिवाणाने मार मारून वाड्याबाहेर कायढून दिले, आणि शिपायाच्या स्वाधीन करून दिले. आणि शिपायाने मला वनामध्ये सोडून दिले.

वढर : ठीक आहे बेबीनंदा. तू त्याची काहीच काळजी करू नको. आपण आता कोणाचेही गोट्यामातीचे काम पाहिले पाहिजे.

गंगासागर : होय बंधु.

वढर : गाणे...

बेबीनंदा चाल करू शेतीचा धंदा
आता काढ कुंदा (गवत)
एचफोर पेरली यंदा
तेथे वाढलाय लयलय कुंदा
पुढारी बनेल यंदा
आता काढ कुंदा
बेबीनंदा चाल करू शेतीचा धंदा
आता काढ कुंदा

वढर : बाई, आता आपल्याला बांदीचे काम करायला जायचे आहे. तर तू टोपलं घे आणि कामाला चाल.

वढर : गाणे ...

घे पोरी घे टोपलं घे, नाही नोको मनू
आता प्रेमानं घे बाई कर्मानं घे
हिंडत फिरत वनामध्ये आली
तुझी माझी भेट आता अचानक झाली
आता घे बाई घे टोपलं घे, नाही नोको मनू
आता प्रेमानं घे बाई कर्मानं घे

वढर : बाई टोपलं घे आणि लवकर कामाला चाल.

वढर : गाणे...

चाल धुडम्या रे, चाल धुडम्या रे
चाल माती टाकायाला
साडे बाराचा टाईम झाला

गंगासागर : बंधु, मी आजपर्यंत असे काम केले नाही, आणि मला भुक सुद्धा फार लागली आहे.

वढर : अरे धुडम्या, बाईला भुक लागली आहे. तर आपण आता पगाराला गेलो पाहिजे. अरे धुडम्या पगाराला मग जाऊ. परंतु मी यंदा कापसाच्या गाड्या विकल्या तर मी त्या पैशानं मशीनं आणली, तर मी बाईला पेढा देतो.

गंगासागर : बंधु, पेढा चांगला असेल तर दे. आणि बेकार असेल तर देऊ नोको.

वढर : बिलकुल चांगला आहे बाई. तू त्याची काही फिकर करू नोको.

गंगासागर : तर दे बंधु. अरे बंधु, हा कोठून आणला पेढा. हा तूच खा. तुला मनत होती चांगला असेल तर दे.

वढर : बे, आपण पगाराला गेलो पाहिजे. तर बाई आपल्यासोबत घेतली पाहिजे. अरे, आपण बाईला गोट्याच्या सावलीखाली ठेवली पाहिजे लेका. आबे बाई मेली लेका. अरे, बाई गोट्याच्या सावलीखाली ठेवली आहे.

वढर : गाणे...

चाल धुडम्या रे, चाल धुडम्या रे
चाल जाऊ पगाराला
साडेबाराचा टाईम झाला

**(वढर दिवाणसाहेबांना हाक मारतो)**

वढर : दिवाणसाहेब, घरी आहे का?

दिवाण : कोण आहे रे माझ्या वाड्यासमोर

वढर : बे, आवाज देत आहे. आमी माणसं हावो जी माणसं

दिवाण : आहो, पण तुम्ही माणसं कोण?

वढर : आमी वढर आहो.

दिवाण : तुम्ही कशाकरिता आले आहे रे.

वढर : दिवाणसाहेब, आमी पगाराला आलो आहो. तर आमचा पगार द्या तुमी?

दिवाण : तर ठीक आहे. तुम्ही पूर्णपणे काम केले काय?

वढर : हो साहेब, पूर्ण काम केले.

दिवाण : तर ठीक आहे. तू घे ८० रूपये; आणि तू घे ८३ रूपये. आणि मी आता चालतो.

**(दिवाण जातो)**

वढर : अरे, आपण बाईचा पगार भुलून गेलो. तर मंग आपण आता दिवाणसाहेबांना हाक मारली पाहिजे. दिवाणसाहेब, ओ दिवाणसाहेब.

दिवाण : का आहे रे वढरं हो

वढर : तुमी आमचा पगार केला. पण आमच्या बाईचा पगार नाही देला.

दिवाण : अरे मागच्या वेळेस तुमची बहीण तुमच्या संगे कामाला नव्हती. आणि आज ती कोठून कामाला आली?

वढर : दिवाणसाहेब, आम्ही संक्रातीला गावला पाठवली होती. मनून ती मांगच्या येळेस नवती.

दिवाण : तर मंग तुमी तिला पाठवून द्या. कारण तिचा पगार आमचे राजेसाहेब देते.

वढर : दिवाणसाहेब, जर तिच्या सहीची गरज असेल तर आमी देतो.

दिवाण : अरे, तुमच्या सहीने पगार मिळणार नाही. तर तुम्ही आपल्याच बहिणीला पाठवून द्या.

वढर : चाल रे धुडम्या. आता आपण बाईला पाठवून देऊ.

**(गंगासागर सोबत भाषण)**

वढर : बाई, तुझा पगार आमच्यापाशी दिला नाही. ज्याचा पगार त्याच्यापासी मने बाई. तू जा लवकर पगाराले.

गंगासागर : बंधु, मी पगाराला जाणार. परंतु माझ्या अंगाला धड वस्त्र सुद्धा नाही. आणि मी या फाटक्या कपड्याने कशी काय पगाराला जाणार.

वढर : बाई, तू त्याची काहीच काळजी करू नको. कारण आपण पहिलेच गरीब आहो.

गंगासागर : गाणे...

कपडे नाही माझ्या अंगाला
कशी जाऊ बंधु पगाराला

गंगासागर : तर बंधु, मग मी पगाराला जाते.

वढर : बाई, मी सुद्धा तुझ्या सोबत येतो.

गंगासागर : चाल बंधु.

वढर : दिवाणसाहेब, घरी आहे का दिवाणसाहेब.

दिवाण : कोण आहे?

वढर : मी हाये वढर.

दिवाण : तर मग आणले का तू आपल्या बहिणीला?

वढर : होय दिवाणसाहेब, आणले बहिणीला.

दिवाण : तर मग तिला आमच्या राजेसाहेबापुढे पाठवून दे.

**(राजाला वढर हाक मारतो)**

वढर : राजेसाहेब घरी आहे का?

राजा : कोण आहे रे माझ्या वाड्यासमोर.

वढर : राजेसाहेब, मी वढर हावो. मी आपल्या बहिणीला घेऊन पगारासाठी आलो जी.

राजा : तर तू मंग बाहेर राहा; आणि तुझ्या बहिणीला आत पाठवून दे.

वढर : राजेसाहेब आम्ही दोघेही आतमध्ये येतो.

राजा : अरे, तुला मी बाहेर राहण्यास सांगितले आहे. आणि तुझ्या बहिणीला आत बोलावले आहे. तर मंग तुझ्या बहिणीला आत लवकर पाठवून दे.

**(गंगासागर राजा धर्मपाल सोबत बोलते)**

गंगासागर : राजेसाहेब, द्या माझा पगार.

राजा : बाई, तुझे नाव काय आहे?

गंगासागर : राजेसाहेब, मी आजपर्यंत खरे नाव कोणालाही सांगितले नाही. परंतु आज तुम्ही क्षत्रिय वंशाचे दिसत असल्यामुळे माझे नाव खरे सांगावे लागते.

राजा : बाई, तर मग तू आपले खरेच नाव सांग.

गंगासागर : राजेसाहेब, १) माझे खरे नाव गंगासागर आहे. २) माझ्या वडिलाचे नाव दंतपाल आहे. ३) आणि माझ्या भावाचे नाव धर्मपाल आहे राजेसाहेब.

धर्मपाल : बाई, तोच मी तुझा भाऊ. तू या वढराच्या संगतीने कशी काय आली, ते मला लवकर सांग.

धर्मपाल : सांग बाई, लवकर सांग.

गंगासागर : गाणे...

काय सांगू गा बंधुराया
संतसेनं गेले स्वर्गाला

संतसेनं गेले स्वर्गाला
त्यांच्यामागे हा वनवास आला
दिवाणाने मार मारून
केले शिपायाच्या स्वाधीनं
शिपायाला द्या येऊनं
दिले वनामंधी सोडूनं

**(गंगासागरचे धर्मपाल सोबत भाषण)**

धर्मपाल : बाई, तू माझी बहीण आहे आणि मी तुझा भाऊ आहे.

धर्मपाल : गाणे...

तू माझी बहीणं मी तुझा भाऊ
अर्धालं राज्य वाटूनं घेऊ

**(शंकावती नगरीच्या दिवाणाला स्वप्न पडते)**

दिवाण : चला आता आपण आपल्या शिपायाला ही बातमी विचारली पाहिजे. शिपाई अलिकडे.

शिपाई : आज्ञा महाराज. कोणती कामगिरी आहे ते मला लवकर सांगा.

दिवाण : गाणे...

कशी केली शिपाया बयमानी रे
गंगासागरला दिले सोडुनी
रात्री मला सपन पडले रे
गंगासागरला वनी सोडिले

दिवाण : शिपाई, तुने माझ्याशी धोकेबाजी केली आहे. व त्या पापिणीला वनात सोडले. तरी आपण गोरखनाथाचे सोंग घेऊन तपास केला पाहिजे.

## ——— अंक तिसरा समाप्त ———

# अंक – ४

दिवाण : शिपाई, आता आपण गंगाराणीचा शोध लावला पाहिजे.

शिपाई : होय, आपण गंगाराणीचा शोध लावला पाहिजे.

शिपाई : गाणे...

ऐकं दिवाणा सांगतो तुला
गंगासागरं असेल नगराला

गोरखनाथाचे वेश घेऊनं
गंगासागरं आणू शोधूनं

**(दिवाण व शिपाई गोरक्षनाथाचे वेष घेऊन गंगाराणीचा शोध करतात)**

दिवाण व शिपाई : दोघांचे गाणे...

आम्ही जातीचे, जातीचे गोरखनाथं
आम्ही राहातो बंगालदेशातं

शिपाई :

चालं जाऊ पूर्व दिशेला
गंगाराणीचा शोध करण्याला दिवाणा

दिवाण :

पूर्व दिशा आलो फिरूनं
पता नाही रे या राणीचा शिपाया
पता नाही रे या राणीचा शिपाया
धक्का बसला माझ्या जिवाला

शिपाई :

चालं जाऊ पश्चिम दिशेला
गंगाराणीचा शोध करण्याला दिवाणा

दिवाण :

पश्चिम दिशा आलो फिरूनं
पता नाही रे या राणीचा शिपाया
पता नाही रे या राणीचा शिपाया
धक्का बसला माझ्या जिवाला

शिपाई :

चालं जाऊ सरळ दिशेला
गंगाराणीचा शोध करण्याला दिवाणा

दोघे :

आम्ही जातीचे, जातीचे गोरखनाथं
आम्ही राहातो बंगालदेशातं

**(दिवाण व शिपायाला एक नगरी दिसते)**

**(धर्मपाल व गोरक्षनाथ यांचे भाषण)**

**(धर्मपाल आत बोलावून भोजनाचा कार्यक्रम करतो व नंतर गोरक्षनाथांना एखादा पोवाडा म्हणायला सांगतो)**

धर्मपाल : बाई, अगं बाई, आपल्याकडं नवनाथापैकी दोन गोरखनाथ आले आहे. तरी भोजनाची तयारी लवकर कर.

गोरखनाथ : गाणे...

संतसेनं होय आमचा राजा
गंगासागर होय त्याची राणी, महाराजा

राजा गेला वनी तपाला
गंगाराणीने उपकार केला, महाराजा

पापं कर्म गा इने केले
पोटं गुराख्याचे आणले, महाराजा

द्यावे शिपायाच्या स्वाधीनं
द्यावे वाड्याबाहेर कायडूनं, महाराजा

ईला ठेऊनं कोणते सुखं
द्यावे वाड्याबाहेर कायडूनं, महाराजा

**( धर्मपाल रागाने म्हणतो )**

धर्मपाल : बाई, मी तुला बहीण मनून पोसले; परंतु तुने आपल्या वंशाला डाग लावला आहे.

धर्मपाल : गाणे...

तू नोहे ग माझी बहीणं, माझी बहीणं
कोठूनं आली तू कैकाडीनं

याच वेळेला जावे निघूनं, जावे निघूनं
वाड्याबाहेर देतो कायडूनं

गंगासागर : बंधु, त्या गोरखनाथाचे ऐकून तू मला कायडून देऊ नको.

गंगासागर : गाणे...

मारू नोको गा बंधुराया
मी का पडते तुझ्या पाया

राहू दे मला तुझ्या पायाशी
तुझ्या चरणाची होईलं दासी

नको मारू सग्या बहिणीला
पापं घडेल तुझ्या हाताला

धर्मपाल : बाई, तू माझी बहीण नसून वैरीन आहे. तुने आपल्या राजवंशाला डाग लावला आहे.

धर्मपाल : गाणे...

वाईट कर्म ग तुने केले
पोटं गुराख्याचे आणले, माझे बाई

गंगासागर : तो गर्भ गुराख्याचा नसून तो तुझ्या भाटव्याचा आहे बंधु.

गंगासागर : गाणे...

गर्भ नोहे कोण्या दुसऱ्याचा
गर्भ होये तुझ्या भाटव्याचा, बंधुराया

बोलू नोको गा हिनतीनं
तुझ्या पाठची होयं बहीणं

मारू नोको गा बंधुराया
पोटी आहे गा गर्भीची छाया

गंगासागर : बंधु, हा गर्भ दुसऱ्याचा नसून तुझ्या भाटव्याचा आहे.

धर्मपाल : गाणे...

सोडं सोडं ग माझा शिनगारं, माझा शिनगारं
मार्ग वनाचा तू ग धरं

सोडं सोडं ग चोळी लुगडं, चोळी लुगडं
मार्ग वनाचा तू ग धरं

उतरूनं ठेवं माझा शिनगारं, माझा शिनगारं
मार्ग वनाचा तू ग धरं
(शिनगार – शृंगार)

**(धर्मपाल गाणे चालू असताना गंगासागरचा शिणगार उतरवते)**

धर्मपाल : बाई, तू माझ्यासमोर काही खोटेनाटे बोलू नको. लवकर चालती हो.

गंगासागर : गाणे...

येऊ देरे बंधु माझी दया
मी का पडते तुझ्या पाया

पुढे आला गा दिवाळी सणं
भाऊबिजेला ओवाळीनं

मारं मारूनं घेते का जीवं
येतं नाही रे पाप्या किवं

धर्मपाल : बाई, तू मरशीन तरी मला तुझी काहीच किव नाही.

गंगासागर : गाणे...

देवा किती करू आरती आरती
नाही केली गा, नाही केली गा आम्हा मरजी
धावं पावं गा शिवशंकरा, शिवशंकरा
साह्य व्हावे अशा वेळेला, वेळेला
साह्य व्हावे अशा वेळेला, वेळेला
म्हणून तुझा मी धावा केला

शिपाई : गाणे...

हाती तलवारं राणी गरवारं, राणी गरवारं
राणीचे बाळंतपणं कोणं करणारं

गंगासागर : गाणे...

धावं पावं गा शिवशंकरा गा शंकरा
साह्य व्हावे गा,
साह्य व्हावे अशा वेळेला
धावं पावं गा शिवशंकरा शिवशंकरा
साह्य व्हावे अशा वेळेला
म्हणून तुझा मी धावा केला

**(इतक्यात भगवान शंकरजी येतात)**

शंकरजी : चला, आज आपण मृत्युलोकात मन गमन करण्याकरता गेलो पाहिजे

शंकरजी : गाणे...

आता जातो मृत्युलोकातं, मृत्युलोकातं
मृत्यु लोकांच्या भेटी घेण्यासं, घेण्यासं

**(तेवढ्यात पार्बता (पार्वती) येते)**

पार्बता : देवा, तुम्ही मृत्युलोकात मन गमन करण्यास जाता. तरी मी सुद्धा तुमच्या सोबत येते.

पार्बता : गाणे...

देवा येते मी, येते मी तुमच्या संगतीला
मृत्यु लोकांचे, लोकांचे कौतुक पाहाण्याला
तिथे राजाची आहे गा राणी
तिथे शंकर पाराबती

**(पार्बता व शंकरजीचे भाषण)**

शंकरजी : पार्बता, तुझा हट्ट आहे तर चल.

पार्बता : देवा, येथे कोण्यातरी स्त्रिचे बाळंतपण झाले आहे. तुम्ही इथेच थांबा मी लवकर येते.

**(वनात गंगाराणीचे बाळंतपण होते)**

पार्बता : बाई, हा घे तुझा बाळ.

**(गंगासागर बाळ वनात ठेऊन नगराला भिक्षा मागते)**

गंगासागर : गाणे...

बाळं ठेऊन आले वनी, आले वनी
भिक्षा वाढाना, भिक्षा वाढाना मायबहिणी

बाळं माझा ताना वनातं, वनातं
पापीनं आली तुमच्या दारातं, दारातं

हिंडतं फिरतं आले वनी, आले वनी
भिक्षा वाढाना मायबहिणी, मायबहिणी

धावं पावं गा शिवशंकरा शिवशंकरा
साह्य व्हावे अशा वेळेला वेळेला

तिनं महिण्याचा बाळं ताना, बाळं ताना
कैसे पोसू मी, कैसे पोसू मी याला वना

वनं लागला रेऊ डोंगरं
डोंगरं झालं हिरवं गवताळं

राजवंशाचा माझा बाळं
नाही झाले रे संपूर्ण लाडं

पोटी अन्नाचा नाही थारा
दूधं कुठले पाजू बाळा

आमच्या नशिबी वनवास आला
म्हणून फिरतो आम्ही वनाला

धावं पावं गा शिवशंकरा शिवशंकरा
साह्य व्हावे अशा वेळेला

**(शिपाई व दिवाण शिकारीला जातात. तेथे गंगासागर दिसते. तिघांचे भाषण)**

दिवाण : गंगासागरराणी तुझा बाळ दे.

गंगासागर : दिवाणा, मला मारून टाक; परंतु माझ्या बाळाला मारू नको. मी तुझ्या पाया पडते.

**(दिवाण शिपायाला सांगतो)**

दिवाण : शिपाई, हा बाळ घे आणि याचे शिरच्छेदन करून नगराला लवकर वापस ये.

शिपाई : महाराज, तुमच्या म्हणण्याप्रमाणे मी याचे शिरच्छेदन करतो. पण या पापाचा वाटेकरी कोण?

शिपाई : गाणे...

गोरा गोरा गोमटा, आखुडसा बांधा
राजाचा हा बाळं
दिवाणा वधू नको याला

शंकावती या नगरीचा
राजाचा हा बाळं
दिवाणा वधू नको याला

शिपाई : दिवाणा, हे तुझे कपडे घे, मी शिरच्छेदन करणार नाही.

दिवाण : शिपाई, तुला जर या बाळाचे शिरच्छेदन करायचे नसेल तर मी करतो. तू चालता हो. दिवाण बाळाला ठार मारतो.

**(शिपाई रागाने कपडे उतरवून निघून जातो. शंकरजी मृत्यूलोकात गमन करण्यासाठी येतात.)**

शंकरजी : चला, आता आपण मृत्युलोकात गमन करण्याकरता गेलो पाहिजे.

पार्बता : देवा, तुम्ही मृत्युलोकात गमन करण्याकरता जाणार; आणि मी येथे एकटी कशी काय राहणार. मी सुद्धा तुमच्या सोबत येणारं

पार्बता : गाणे...

देवा येते मी, येते मी, तुमच्या संगतीला
मृत्यु लोकांचे लोकांचे कौतुक पाहण्याला
जिथे राजाची राजाची आहे राणी
तिथे शंकर शंकर पाराबती

पार्बता : देवा मी सुद्धा तुमच्या सोबत येणार.

शंकरजी : पारबता, तुझा हट्टच आहे तर चल.

पार्बता : देवा इथे कोण्यातरी दोन जिवाची आत्महत्या झालेली दिसत आहे. तर तुम्ही अमृत पाजून त्यांना जिवंत करा.

पार्बता : गाणे...

पाहा कर्माची गती किती न्यारी
या राणीवरं वेळ कशी आली

कोण्या पाप्याने सोडिले वनाला
वध करोनी गेले नगराला

यांना पाजूनं, पाजूनं अमृतं
यांना करावे, करावे जिवितं

**(शंकरजी अमृत पाजून गंगासागर व बाळाला जिवंत करते)**

पार्बता : बाई, तो बाळ दे माझ्याजवळ.

शंकरजी : पार्बता, तो बाळ दे माझ्याजवळ. मी त्याला बळ देतो. ह्या बाळाचे नाव रत्नपाल ठेव बाई.

**(गंगासागर बाळाचा पाळणा म्हणते)**

## पाळणा

बाळा जो जो रे, जो जो रे रत्नपाला
आई हालविते हालविते पाळणा ।। धृ ।।

संतसेनं तुझा पिता, गंगासागरं तुझी माता
तुझे पिता गेले स्वर्गाला, त्याच्या मागे वनवास आला ।१।

गाईनं तू बाई, बारशाला येजो
माझ्या का बाळाला गण तू गावजो ।। २ ।।

माली गा तू दादा, बारशाले येजो
माझ्या का बाळाचे तू जावळं काढजो ।। ३ ।।

शिंपी गा तू दादा बारशाले येजो
आंगडं टोपरं माझ्या बाळाले आणजो ।। ४ ।।

सोनार तू दादा, बारशाले येजो
हसरी बिंदले माझ्या बाळाले आणजो ।। ५ ।।

लोहारं तू दादा बारशाले येजो
दंडाचा पाळणा माझ्या बाळाले आणजो ।। ६ ।।

बाळा लागू देरे डोळा, आई हालविते पाळणा
बाळा जो जो रे रत्नपाला ।। ७ ।।

संतसेन तुझा पिता, गंगासागर तुझी माता
बाळा लागू देरे डोळा, आई हलविते पाळणा ।। ८ ।।

शिपायाला दया येऊनं
दिले वनामध्ये सोडूनं ।। ९ ।।

काय सांगू गा रत्नपाला
तुझा जन्म वनामध्ये झाला ।। १० ।।

दिवाणाने आडवे होऊनं
घेतले आपले दोघांचे प्राण ।। ११ ।।

शंकर पाराबती प्रसन्न होऊनं
केले जिविंतं अमृत पाजूनं ।। १२ ।।

शंकराने वर तुला दिला
नाही मरणं येणारं बाळा तुला ।। १३ ।।

कायं सांगू गा रत्नपाला
संतसेनं गेले स्वर्गाला ।। १४ ।।

बाळा जो जो रे, जो जो रे रत्नपाला
आई हालविते हालविते पाळणा ।। १५ ।।

**(रत्नपाल बाहेर शिकार करण्याकरिता जातो, आणि दिवाण येतो. रत्नपाल परिचय देतो)**

रत्नपाल : आई, मी बारा वर्षाचा झालो. तर आता मला शिकार करण्याकरता गेलो पाहिजे. आई, मी शिकार करण्याकरता गेलो असताना मला नाव विचारले. मी माहित नाही असे

म्हटले. तर मला निपाट्या म्हटले आई. आई, माझे नाव काय आहे ते मला लवकर सांग?

गंगासागर : गाणे...

काय सांगू गा रत्नपाला
संतसेनं गेले स्वर्गाला ।। १ ।।

संतसेनं गेले स्वर्गाला
त्यांच्या मागे हा वनवासं आला ।। २ ।।

दिवाणाने मारं मारूनं
दिले वाड्याबाहेर कायडूनं ।। ३ ।।

शिपायाला दया येऊनं
दिले वनामध्ये सोडूनं ।। ४ ।।

बहीण मनून ओळखले भावानं
सांभाळं केला मोठ्या आनंदानं ।। ५ ।।

गोरख्याचे खोटे ऐकूनं
दिले वाड्याबाहेरं कायडूनं ।। ६ ।।

दिले शिपायाच्या स्वाधीनं
शिपायाला द्या येऊनं दिले वनामध्ये सोडूनं ।। ७।।

गंगासागर : बाळा तोच तो दुष्ट दिवाण.

रत्नपाल : गाणे...

आता जाईनं बिरबलच्या वाड्याला
उभा राहीनं दरवाज्याला ।। १ ।।

हाकं मारीनं मी त्याला
उभा राहीनं दरवाज्याला ।। २ ।।

अरे दिवाणा बसला गादीवर
एकं लातं मारीन तुझ्या छातीवर ।। ३ ।।

माझ्या पित्याचे राज्य असूनं
बळजब्राईने घेतले हिसकूनं ।। ४ ।।

अशी कशी रे डोळ्याला धुंदी, डोळ्याला धुंदी
राजाची राणी नाही ओळखली ।। ५ ।।

रत्नपाल : दिवाणा, माझ्या पित्याचे राज्य असून तुने माझ्या आईला वनवास दिला. आता लढण्यास तयार हो दिवाणा.

रत्नपाल : गाणे...

चोड्ट्या चोरा हरामखोरा, हरामखोरा
तुला पाठवितो यमपुरा

दिवाण : गाणे...

गुराख्याच्या तू रे पोरा, तू रे पोरा
भरं हातामध्ये बांगड्या
खेळं पोरीच्या फुगड्या

**(रत्नपाल व गंगाराणीचे भाषण)**

रत्नपाल : आई, मी त्या पापी दिवाणाला ठार मारले आहे. आणि हे राज्य आता आपले झाले. तू या गादीवर बस. आणि माझ्या मामाच्या वाड्याला कोणता मार्ग जातो ते मला लवकर सांग.

रत्नपाल : गाणे...

आता जाईनं जाईनं मामाच्या वाड्याला
उभा राहीनं दरवाज्याला ।। १ ।।

असा कसा रे शूरवीरं शूरवीरं
आता उडवतो तुझे शिरं ।। २ ।।

चोड्ट्या चोरा हरामखोरा हरामखोरा
लाजं नाही तुझ्या जिवाला ।। ३ ।।

अशी कशी रे डोळ्याला धुंदी, डोळ्याला धुंदी
पाठची बहीणं नाही ओळखली ।। ४ ।।

**(रत्नपालाचे मामासोबत भाषण)**

रत्नपाल : मामा, तुने माझ्या आईला पाप लावले, तर तू सुद्धा युद्धास तयार हो.

रत्नपाल : गाणे...

शंकराने मला वरं दिला वरं दिला
नाही भिनारं मरणाला

धर्मपाल : गाणे...

गुराख्याच्या तू रे पोरा, तू रे पोरा
भरं हातामध्ये बांगड्या
खेळं पोरीच्या फुगड्या

**(धर्मपाल आपली बहीण गंगाराणीला शरण जातो)**

धर्मपाल : बाई, मी तुला शरण आलो आहे. तू मला मरण देऊ नको.

धर्मपाल : गाणे...

बाई आलो तुला शरणं
नको देऊ मला मरणं माझे बाई
एकं भाऊ गा एकं बहीणं
चोळी लुगडं कोणं घेईनं

**(गंगासागर व रत्नपालाचे भाषण)**

गंगासागर : बाळा, तुझा मामा तुला शरण आला आहे. तरी तू त्याला मरण देऊ नको.

गंगासागर : गाणे...

मामा आला गा तुला शरणं
नको घेऊ गा त्याचा प्राणं, त्याचा प्राणं ।। १ ।।

एक भाऊ गा एक बहीणं
चोळी लुगडं कोणं घेईनं ।। २ ।।

पुढे आला गा दिवाळी सणं
भाऊबिजेला ओवाळीनं ।। ३ ।।

धर्मपाल : बाई, माझी मुलगी लग्नाला झाली आहे.

रत्नपाल : गाणे...

मुलगी पाहीनं मी देखणी
मला शोभेल देवराणी माझे बाई

रत्नपाल : आई, मी मुलगी पाहिल्याशिवाय लग्न करणार नाही.

चंद्रसेना : बाबा मुलगा पसंत आहे मला.

चंद्रसेना : गाणे...

मुलगा पसंत आहे मला
लागा लग्नाच्या तयारीला, बाबाजी

रत्नपाल : मामा, मुलगी पसंत आहे मला.

रत्नपाल : गाणे...

मुलगी पसंत आहे मला
लागा लग्नाच्या तयारीला मामाजी.

**मंगलाष्टक**

आली लग्नघटी समीप नवरा
होऊनिया व्हा घरा
गृहयोक्ते मधुपर्क पूजनं करा
अंतरपटा ते धरा
दृष्टात दृष्ट वधु वरा न करिता
दोघे करावी उभी
वाजंत्रे बहू गलबला न करणे
कुर्यात् सदा मंगलम् शुभ मंगलमं सावधानं

**(रत्नपालाच्या पत्नीचा परिचय)**

दिवाण : गाणे –

शंकावती या नगरीचा राजा रत्नपालं
त्याचा मी चतुरं दिवाण ।। १ ।।

चंद्रसेना होय त्याची राणी
तिची किर्ती विचारा कोणी, देवा कोणी ।। २ ।।

## आरती

हाती घेऊन आरती जाऊ पोहण्याला
ओवाळू आम्ही सोनामातेला ।। १ ।।

हाती घेऊन आरती जाऊ शेगावला
ओवाळू आम्ही गजाननाला ।। १ ।।

हाती घेऊन आरती जाऊ कापशीला
ओवाळू आम्ही नानाजीला ।। ३ ।।

हाती घेऊन आरती जाऊ वायगावला
ओवाळू आम्ही लक्ष्मीमातेला ।। ४ ।।

हाती घेऊन आरती जाऊ आजनसऱ्याला
ओवाळू आम्ही भोजाजीला ।। ५ ।।

हाती घेऊन आरती जाऊ पारडीला
ओवाळू आम्ही नगाजीला ।। ६ ।।

हाती घेऊन आरती आलो अल्लीपूरला
ओवाळू आम्ही भवानी मातेला ।। ६ ।।

हाती घेऊन आरती जाऊ पोहण्याला
ओवाळू आम्ही सोनामातेला ।। ७ ।।

आमची झाली असेलं चुकं, तुम्ही करावे माफं
साह्य व्हावे आम्हाला, आम्हा बालकाला ।। ८ ।।

## ——स—मा—प्त——



लोकनाट्याचा प्रेक्षक हा गावातीलच असतो. गावातील सगळे स्त्री–पुरूष आणि लहान मुले नाटक पाहायला येतात.

